MAHMAR 19338/13/1/2000-TC



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ८ / ऑगस्ट २०११

## संपादकीय

### दहशतवाद

एखादी गोष्ट वारंवार घडू लागली की तिचे गांभीर्य संपते आणि माणूस त्या गोष्टीला सरावतो. हे असं व्हायचंच हे गृहीत धरुन आपलं जगण्याचं रहाट गाडगं ओढत राहतो. सुख आणि दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे 'उद्या तरी हे बदलेल' या दुर्दम्य आशेवर तो जगत राहतो.

दहशतवादी कारवाया आणि या विषयाचे बारीकसारीक कंगोरे लक्षात घ्यायला लागले की या विषयाचे ही असेच होते. असे स्फोट होत रहाणारच, त्यात काहीजण मरणार, उद्या आपली वेळ असेल तर आपणही बळी पडणार हे वास्तव व्हायला लागलं आणि माणसं ते गृहीत धरुनच जगायला लागली. आपल्या दाराच्या उंबरठ्यापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत या विषयाची व्याप्ती वाढली आहे. हा विषय एक वेगळा विषय ठरु शकतो, याची कल्पनाही करणे एकेकाळी अवघड होते. आज मात्र या विषयावर असंख्य पुस्तके, सिनेमे उपलब्ध आहेत. या विषयाचा आवाका इतका झपाट्याने वाढला की राज्यशास्त्राच्या अभ्यासक्रमातही या विषयाने स्थान मिळवले.

या कारवाया करणारी माणसे मानसशास्त्रीय दृष्ट्या पछाडलेली असतातच; शिवाय त्यांच्यावर जाणीवपूर्वक केले जाणारे संस्कारही विकृतच असतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण देणाऱ्या दहशतवाद्यांच्या छावण्या असू शकतात, त्यांचे ठावठिकाणे संबंधित देशांच्या शासन कर्त्यांना माहीत असतात आणि तरीही अशा छावण्या उध्वस्त केल्या जात नाहीत, हे सामान्य माणसाच्या दृष्टीने कोडेच असते. ११/९ सारखी जग हादरवणारी घटना असो की ९२-९३ साली मुंबईत झालेले साखळी बॉम्बस्फोट असोत... या सर्वामागे असणारे हात हे सुसंस्कारित माणसांचे असणे शक्यच नाही. गेल्या सुमारे तीस वर्षात व्याप्ती वाढत राहिलेल्या या विषयाचा परिणाम होणारा सर्वसामान्य समाज दिग्मूढ होण्याशिवाय काही करु शकत नाही. ज्या शासनाने समाजात शांती सुरक्षा ठेवण्याची हमी घ्यावी अशी अपेक्षा असते ते शासन त्याची तपास यंत्रणाही याबाबत काही करु शकत नाहीत. आपल्याकडे इतक्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाले, पण कोणत्याही

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

घटनेतील दोषी कोण? त्यांचे पुढे काय झाले? त्यांचा तपास लागला का? या व अशा असंख्य प्रश्नांना उत्तरे मात्र मिळत नाहीत. या सर्वांत आपल्याकडे होणाऱ्या चर्चांमध्ये आता सी. सी. टी. व्ही. (क्लोज सर्किट टी.व्ही.) हा नवीन अध्याय रंगत आहे. अमूक सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसवणार, तमूक कंपनीला याचे कंत्राट देणार अशा विषयांवर नगरपालिका, राज्य या स्तरावरचे लोकप्रतिनिधी चर्चा सत्रे रंगवत आहेत.

अशी चर्चा ऐकली की असे वाटते, एखाद्या खेळण्यासंबंधीच ही माणसे बोलताहेत! कोट्यवधी रुपयांच्या गणितातले हे कॅमेरे असतात तरी कसे कोण जाणे? ते बसवायचे म्हणजे काय करायचं व एका रस्त्यावर किती बसवायचे हा ही प्रश्न आपल्यासारख्या 'बुद्धीची झेप' नसणाऱ्या सामान्य माणसाला पडतो. शिवाय कायदा तिथे पळवाटा या न्यायाने हे कॅमेरे उखडून काढून तिथे बॉम्बस्फोट घडवले जाणार नाहीत कशावरुन? शिवाय हे कॅमेरे सतत आणि कायम कार्यक्षम कसे राहतील? काही कॅमेरेतर बसवण्यापूर्वीच नादुरुस्त असण्याची पुरेपूर शक्यता आहे. 'परदेशात असे कॅमेरे कसे बसवले ते पहायला नगरसेवकांचे एक पथक परदेश वारीस' अशा बातम्या वाचल्या की करमणूक कशाला म्हणतात ते समजते.


मुळातच समाजकारण आणि राजकारण यांच्यातील सीमारेषा आम्ही इतकी पुसट केली आहे की समाजाच्या उपयोगाचे काहीही करताना आमच्या राजकीय स्वार्थाचे डोके वर येते. सर्वच गोष्टींचे राजकारण करण्यात आम्ही वाकबगार असल्याने या विषयातही आम्ही राजकारण आणले व विषयाचे महत्त्व कमी करुन टाकले. एखाद्या स्फोटात जखमी झालेल्या नागरिकांना त्या स्फोटाच्या तीव्रतेनुसार पंतप्रधान व नगरसेवक अशा पदावरची माणसे इस्पितळात भेटावयास येणे, त्यांच्या बातम्या तयार होणे, चर्चा होणे आणि संबंधित व्यक्तीच्या कार्य अहवालात घटनेची नोंद होणे हे ज्या तत्परतेने आम्ही करतो त्याच्या अर्ध्या तत्परतेनेही दोषी शोधून काढायचे काम केले तर पुरेसे ठरेल!


या दहशतवादी कारवायांत मानवी बॉम्ब पर्यंतचे सगळे काही वापरले जाते. एखाद्या ठिकाणी हल्ला घडवायचा व त्यासाठी कोणत्याही स्तरापर्यंत जायचे असेच ठरवल्यावर कसला विधिनिषेध पाळला जाणार? या कारवाया करणाऱ्यांना फक्त हल्ला करायचा इतकेच माहीत असते. ही माणसे नसतात तर बुद्धिबळाच्या पटावरील प्यादी असतात. त्यामुळे यांची हवी तशी हालचाल घडवणारे मेंदू शोधले पाहिजेत. हा प्रयत्न तर होतच नाही.

समाजाच्या उपयोगासाठी जर 'समाजकारण' करायचे असेल तर त्यामागील राजकीय स्वार्थ चिरडायला हवा. हे होत नाही तोवर अशा कारवायांच्या घटना घडत राहणार. त्यावर चर्चा परिसंवाद रंगत जाणार फरक फक्त मागील घटना विसरलेली असेल व नुकतीच घडलेली घटना पुढ्यात असेल इतकाच!

**- मोहन पाठक**

●●●





व्ही.पी.एम्.

# दिशा


वर्ष तेरावे / अंक ८ / ऑगस्ट २०१२



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ ११९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | केंब्रिज विद्यापीठ परिसरातून फेरफटका | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | बौध्दिक संपदा, पेटंट आणि पारंपरिक ज्ञान अंकीय ग्रंथालय | प्रा. श्रीनिवास आठल्ये | ९ |
| ४) | स्वामी विवेकानंदांनी आपल्या विविध भाषणातून व्यक्त केलेले विचार | श्री. शं. बा. मठ | १३ |
| ५) | महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारा | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | १८ |
| ६) | माझी जन्मठेप | आदित्य जोशी | २३ |
| ७) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २८ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |
| ९) | प्रगत अध्ययन केंद्राचा अभ्यासक्रम व माहिती | श्री. मोहन पाठक | ३९ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# केंब्रिज विद्यापीठ परिसरातून फेरफटका

*ऑक्सफर्ड आणि केंब्रिजला जाणे हे अनेकांचे स्वप्न असते. डॉ. आगरकरांबरोबर केंब्रिजला भेट देणारी मुले नशीबवान हे खरे! त्या भेटीचे हे वर्णन - संपादक*

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे भारतीय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करते. या सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या तीन शहरांना भेटी दिल्या जातात. ऑक्सफर्डची भेट संपवून चमू नंतर केंब्रिजला पोहोचला. पहिला दिवस केंब्रिज टूरच्या बसने संपूर्ण शहराची सहल केली जाते. काही महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्या जातात. दुसऱ्या दिवशीची सकाळची वेळ केंब्रिज विद्यापीठ परिसरातून पायी फिरण्यासाठी वापरली जाते. ऑक्सफर्ड विद्यापीठात बिनसल्यामुळे काही मंडळींनी तेथून बाहेर पडून केंब्रिजला एका कॉलेजची स्थापना केली. त्यानंतर अनेक कॉलेजेस येथे निर्माण झाली. या सर्व कॉलेजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंब्रिज विद्यापीठाची स्थापन करण्यात आली. विज्ञानाच्या क्षेत्रात या विद्यापीठाला चांगले नाव आहे. अणूच्या संरचनेचा शोध येथे लागला, डीएनए रेणूची रचना कशी असते. याबद्दल प्रथम माहिती याच विद्यापीठात झाली. सर आयझॅक न्यूटन, चार्लस डार्विन हे शास्त्रज्ञ येथेच काम करीत होते. भारतातील डॉ. होमी भाभा, जयंत नारळीकर या शास्त्रज्ञांनी येथेच शिक्षण घेतले 'जगातील सर्वात जास्त नोबेल पारितोषिक विजेते जेथे आहेत असे विद्यापीठ' अशी या विद्यापीठाची ओळख आहे. त्यामुळे हे विद्यापीठ पाहण्याची उत्सुकता सर्वच विद्यार्थ्यांमध्ये होती. म्हणूनच सहलीचा अर्धा दिवस आम्ही विद्यापीठ परिसराचा फेरफटका मारण्यासाठी राखून ठेवतो.

त्या दिवशी सकाळीच नाश्ता आटोपून आम्ही युथ होस्टेलच्या बाहेर पडलो आणि पायी चालत स्टेशन गाठले. स्टेशनवरून गावात जाणाऱ्या बसेस लागोपाठ सुटतात. त्यांतील एका बसने आम्ही गावाच्या मध्यभागात (City Centre) आलो. तेथून आम्ही पायी फिरायला सुरुवात केली. बस स्टॉपपासून कॉलेज परिसरापर्यंत लहानशा बोळातून जावे लागते. दगडाच्या उंच उंच इमारती अगदी जवळजवळ बांधलेल्या आहेत. दोन इमारतींच्या मध्ये फारच थोडी जागा आहे. त्यामुळे रस्ता फारच अरुंद आहे. या रस्त्यावर वाहनांना येण्यास बंदी आहे. पायी चालणारे लोक आणि सायकलस्वारच फक्त या रस्त्याने जाऊ शकतात. केंब्रिज हे विद्यार्थ्यांचेच केंद्र असल्याने येथे विद्यार्थ्यांची संख्या खूप आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे बहुधा एक सायकल असतेच. त्यामुळे शहरात सायकलस्वारांची संख्या बरीच मोठी आहे. गावात सायकल विकणारी अनेक दुकाने आहेत. त्याचबरोबर सायकल दुरुस्त करण्याच्या सोयीदेखील जागोजागी आहेत. रस्त्यावर सायकलींना जाण्यासाठी वेगळी लेन दिलेली आहे. विद्यार्थी या लेनमधून शांतपणे जात असतात. सकाळची वेळ असल्याने बरेच विद्यार्थी आपापल्या कॉलेजकडे जात होते. त्यामुळे रस्त्यावर सायकलींची चांगलीच वर्दळ होती. आपल्याकडे विद्यार्थी कॉलेजला गेला की स्कूटर किंवा मोटार सायकलीची मागणी करतो. कॉलेजच्या आवारात अशा अनेक मोटार सायकली आणि स्कूटर्स उभ्या असतात. केंब्रिजमधल्या कॉलेजात मात्र कॉलेजच्या पुढे सायकली उभ्या असतात. सायकलस्वाराच्या गर्दीतून वाट काढत आम्ही एका मोठ्या चौकात पोहोचलो.



शहरातील एक जुने गोलाकार चर्च

चौकात एका बाजूला एक मोठे पुस्तकाचे दुकान आहे. केंब्रिज विद्यापीठाचा स्वत:चा छापखाना आहे. येथे पुस्तके छापून विद्यापीठातर्फे प्रकाशित केली जातात. या पुस्तकांच्या विक्रीचे ठिकाण येथे आहे. त्याला केंब्रिज विद्यापीठ प्रेस (Cambridge University Press) असे समर्पक नाव आहे. आम्ही त्या दुकानात जाऊन तेथील पुस्तकांचा संग्रह पाहून आलो. विज्ञानाची अनेक पुस्तके आम्हांला तेथे पाहायला मिळाली. याखेरीज इतिहास, अर्थशास्त्र, धर्म या विषयांवरदेखील तेथे पुस्तके होती. केंब्रिजमधील संग्रहालये या छोटेखानी पुस्तकाने आमचे लक्ष वेधून घेतले. संग्रही ठेवण्यासाठी म्हणून आम्ही ते विकत घेतले आणि दुकानाच्या बाहेर पडलो. तोच आमचे लक्ष एका जुन्या चर्चकडे गेले. त्याच्या बाजूला लिहिले होते The Oldest Church in Cambridge. या सगळ्यात जुन्या चर्चमध्ये जाऊन पाहावे अशी आम्हाला इच्छा झाली. चर्च लहानसेच आहे आणि बारीक बारीक दगडांनी ते बांधले आहे. इतर चर्चसारखेच ते आहे. फक्त ते सगळ्यात जुने असल्याने त्याचे महत्त्व वेगळे आहे. चर्चमधून आम्ही बाहेर पडलो ते खुला बाजार (Open Market) असा फलक आमच्या नजरेस पडला. त्या फलकावर दाखविलेल्या दिशेने आम्ही चालत गेलो तर एक लहानसे मार्केट आम्हांला दिसले. आपल्याकडे जसा आठवडी बाजार भरतो, तसा हा बाजार दिसत होता. काही दुकानदारांनी शेड उभारले होते तर काहींनी आपल्या वस्तू उघड्यावरच ठेवलेल्या होत्या. येथे घरगुती कामाच्या वस्तूंखेरीज अनेक खाद्यपदार्थ मिळत होते. मार्केटमध्ये फेरफटका मारून आम्ही मूळच्या चौकात आलो.



शहरातील खुला बाजार


चौकातील एक दगडी इमारत आपल्या नजरेत भरते. कॉलेजची इमारत, त्याच्या शेजारी असलेले भव्य चर्च, सभोवतालची भिंत आणि त्याला असलेले छोटेसे प्रवेशद्वार आम्हांला खुणावत होते. त्या प्रवेशद्वाराजवळ आम्ही गेलो. तेथे एक पाटी होती आणि त्यावर लिहिले होते किंग्ज कॉलेज (King's College). या कॉलेजबद्दल आम्ही खूप ऐकले होते. याच कॉलेजात भारताच्या अणुविज्ञान कार्यक्रमाचे जनक डॉ. होमी भाभा यांनी शिक्षण घेतले होते. भारताचे प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी डॉ. हॉईलबरोबरचा आपला सिद्धांत या कॉलेजमध्ये संशोधन करून मांडला होता. त्यामुळे या कॉलेजाबद्दल आम्हांला फारच कुतूहल होते. त्यामुळे हे कॉलेज पाहण्याची आम्हांला अनावर इच्छा होती. परंतु त्या दिवशी कॉलेजमध्ये प्रवेश

नव्हता. कारण तो दिवस या कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी पदवीदान समारंभाचा होता. पदवी घेण्यासाठी विशिष्ट गणवेश करून आलेले विद्यार्थी कॉलेज परिसरात फिरताना आम्हांला दिसत होते. जरी कॉलेजमध्ये जायला परवानगी नसली तरी चर्चमध्ये जायला परवानगी होती. त्यासाठी प्रवेश शुल्क द्यावे लागत होते. शुल्क भरून आम्ही किंग्ज कॉलेजचे चर्च पाहायचे ठरविले.



किंग्ज कॉलेज परिसर

कॉलेज चर्चमध्ये जाण्यासाठी एका वेगळ्या वाटेने जावे लागते. आम्ही चर्चच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचलो तेव्हा तिथे मोठी रांग लागल्याचे आम्हाला आढळले. केंब्रिजमध्ये पर्यटक म्हणून आलेले अनेक जण हे चर्च पाहायला उत्सुक होते. आम्ही जेव्हा चर्चमध्ये प्रवेश केला तेव्हा त्याची भव्यता आमच्या लक्षात आली. उंची साधारणपणे तीन मजली इमारतीएवढी असावी. त्याच्या मध्यभागी चर्चमध्ये असतो तसा बँड आहे. इमारतीला मोठमोठ्या खिडक्या असून त्याला रंगीबेरंगी कलाकुसर केलेल्या काचा लावलेल्या आहेत. खिडक्यांमधून आलेल्या प्रकाशाने चर्चमधील वस्तू न वस्तू उजळून जाते. कृत्रिम प्रकाशाची मुळीच गरज भासत नाही. येशू ख्रिस्ताची भव्य मूर्ती आपले लक्ष वेधून घेते. आजूबाजूला कलाकुसरीच्या अनेक वस्तू ठेवलेल्या आहेत. चर्चमध्ये एक प्रदर्शन भरविलेले आहे. ख्रिश्चन धर्माची स्थापना, तिचा विकास, धर्माची शिकवण, त्याच्या प्रसारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती अशी अनेक प्रकारची सचित्र माहिती आपल्याला येथे मिळते. हे प्रदर्शन पाहून आम्ही चर्चच्या दुकानात आलो. येथे अनेक लहानमोठ्या वस्तू विक्रीला ठेवलेल्या आहेत. चर्च भेटीची आठवण म्हणून आम्ही काही वस्तू खरेदी केल्या आणि चर्चच्या बाहेर पडलो.



कॉलेजमधील चॅपेल

पुन्हा आम्ही मुख्य चौकात आलो आणि नदीच्या दिशेने चालू लागलो. थोडे अंतर चालून गेल्यावर आम्हांला पाटी दिसली ती क्वीन्स कॉलेज (Queens College). आम्हांला या आधीचे कॉलेज आतून पाहता आले नाही म्हणून हे कॉलेज आत जाऊन पाहायचे आम्ही ठरविले. त्यासाठी प्रवेशशुल्क भरावे लागते. प्रवेशद्वाराजवळच आपल्याला एक नकाशा देतात. नकाशा बघत बघत आपण कॉलेज परिसर फिरून येऊ शकतो. प्रवेशद्वारातून आत जाताच आपल्या नजरेस पडते ते मोठे पटांगण. या पटांगणाच्या चारही बाजूस दगडी इमारत असून पटांगणावर चांगले गवत वाढविले आहे. गवत कापताना अशी काळजी

घेतलेली असते की लॉनमध्ये वेगवेगळ्या रंगाचे पट्टे दिसतात. लॉनमधून तयार केलेल्या रस्त्याने आम्ही पुढे गेलो. आपण जेव्हा इमारतीत प्रवेश करतो तेव्हा आपल्या नजरेस पडते ती डायनिंग रूम. या कॉलेजमध्ये विद्यार्थी राहतात. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना दुपारचे जेवण घेता यावे यासाठी येथे व्यवस्था केलेली असते. डायनिंग टेबल अतिशय आकर्षक दिसते. जणू आपण एखाद्या महागड्या हॉटेलमधून जातो आहोत असे आपल्याला वाटते. पुढे जाऊन आपण उजवीकडे वळलो की पुन्हा एका पटांगणात येतो. या पटांगणाच्या चोहोबाजूला विद्यार्थ्यांना राहण्यासाठी खोल्या आहेत आणि मध्यभागी एक चर्च आहे. त्या चर्चमध्ये जाऊन आम्ही लवकरच बाहेर पडलो.



क्विन्स कॉलेजची इमारत

जिथून आम्ही प्रवेश केला ते जुन्या क्वीन्स कॉलेजचे प्रवेशद्वार होते. जेव्हा ही जागा अपुरी पडायला लागली तेव्हा नवीन इमारत बांधण्यात आली. कॉलेज दर्शनाच्या या कार्यक्रमात नवीन कॉलेजचादेखील समावेश आहे. परंतु ते कॉलेज नदीच्या पलीकडे आहे. तिथे पोहोचण्यासाठी प्रसिद्ध भौमितीय पुलावरून (Geometrical Bridge) जावे लागते. जुन्या इमारतीच्या एका बोळातून आम्ही आलो ते थेट भौमितीय पुलावर. हा पूल लाकडाचा असून अतिशय जुना आहे. असे सांगतात की आयझॅक न्यूटन या पुलावरून १७ व्या शतकात नदी पार करीत असत. आमचे नशीब थोर म्हणून आम्हांला अशी संधी मिळाली, असे आमच्यापैकी बऱ्याच जणांना वाटले. बराच वेळ आम्ही त्या पुलावर उभे राहून इकडचे तिकडचे दृश्य बघत होतो. पुलाच्या खालून बोटी जात होत्या. दूरवर अशा अनेक बोटी दिसत होत्या. दोन्ही बाजूला झाडे, नदीचे स्वच्छ पाणी आणि त्यातून जाणाऱ्या रंगीबेरंगी बोटी हे दृश्य खरोखरीच संस्मरणीय असेच होते. आमच्यापैकी सर्वांनीच त्या बोटींचे फोटो काढले. त्यानंतर आम्ही नवीन क्वीन्स कॉलेजचा परिसर पाहून आलो. तेथे वेगवेगळे विभाग आहेत. इमारतीच्या आत जायला आम्हांला परवानगी नसल्याने इमारतीच्या भोवताली आम्ही एक चक्कर मारली. या परिसरात फिरण्याचा सगळ्यात मोठा आनंद म्हणजे आपल्याला कॅम नदीच्या किनाऱ्यावर फिरता येते. हा खरोखरच आनंददायी अनुभव होता. क्वीन्स कॉलेजची सहल संपवून आम्ही बाहेर पडलो. जेथून प्रवेश केला तेथूनच बाहेर पडावे लागते.



भौमितीय लाकडी पूल


क्वीन्स कॉलेजमधून बाहेर पडून आम्ही कॅम नदीच्या पुलावर आलो. लाकडी पुलाशेजारी असलेला हा दगडी

---

संकटाच्या वेळी केवळ धैर्य हा एकच गुण मानवाच्या अंगी असला, तरी पुरेसे असते.

पूल असून याच पुलावरून आमची टूर बस आदल्या दिवशी गेली होती. ती बस पुढे जाऊन वळते त्याऐवजी आम्ही बागेतून चालत जायचे ठरविले. बागेत विद्यापीठ परिसराची धातूची प्रतिकृती आहे. ती उघड्यावर असून तिला कसलेही अच्छादन नाही. तरीही वर्षानुवर्षे उन पावसात राहून ही प्रतिकृती अजूनही चांगल्या स्थितीत आहे. केंब्रिज शहरातील सगळी कॉलेजेस येथे दाखविली आहेत. प्रत्येक इमारतीजवळ त्या कॉलेजचे नाव लिहिलेले आहे. त्यामुळे आपल्याला कॉलेज परिसराची चांगली कल्पना येते. नदीच्या किनाऱ्याने बागेतून आम्ही चालत होतो. थोड्याच वेळात आमच्या नजरेस ते दृश्य पडले, ज्याने आम्ही आधीच्या बसच्या प्रवासात भारावून गेलो होतो. बसमध्ये असल्यामुळे आम्हांला थांबता आले नाही. परंतु आज तसे बंधन नव्हते. दोन वृक्षांच्या मधून दिसणारे किंग्ज कॉलेज चॅपेलचे ते दृश्य आम्ही डोळे भरून पाहात होतो. सगळ्यांनी तेथे फोटो काढले. सर्वांचा एक ग्रुप फोटोदेखील आम्ही काढून घेतला आणि पुढे चालायला लागलो.

आम्ही नदीकिनाऱ्याने पुढे चालत गेलो तर नदी ओलांडून दुसऱ्या बाजूला जाणारा रस्ता आमच्या नजरेस पडला. त्या रस्त्याने पुन्हा कॉलेज परिसरात जायचे आम्ही ठरविले. दुतर्फा मोठमोठी झाडे. त्यांच्या मागे मोठे पटांगण, पटांगणावर वाढलेले गवत पद्धतशीरपणे कापलेले. त्यामुळे क्रिकेटच्या मैदानावर जसे पट्टे दिसतात तसे पट्टे दिसत होते. त्या वाटेने नदी पार करून आम्ही पुनश्च दगडी जंगलात आलो. दोन्ही बाजूला दगडाच्या उंच उंच इमारती आणि त्यामधून जाण्यासाठी बारीकशी गल्ली असे ते दृश्य होते. या गल्लीत अर्थातच वाहने येऊ शकत नव्हती. पायी चालणारी मंडळी आणि सायकलस्वार मात्र या गल्लीतून ये जा करीत होते. या गल्लीला ट्रिनिटी गल्ली म्हणतात. याचे कारण ही गल्ली आपल्याला ट्रिनिटी कॉलेजला घेऊन जाते. प्रथम आपल्या दृष्टीस पडते ते ट्रिनिटी कॉलेजचे लहानसे प्रवेशद्वार. थोडे पुढे जाऊन डावीकडे वळले की आपण येतो ट्रिनिटी कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ. भव्य आकाराचे प्रवेशद्वार आणि त्यावर धातूनी मढविलेल्या आकृत्या यामुळे त्याला एक वेगळेच महत्त्व आले आहे. या कॉलेजमध्ये आयझॅक न्यूटन १६६४ ते १६६७ या काळात शिकत होते. त्याच कालावधीत त्यांनी गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर याच कॉलेजमध्ये ते शिकवण्याचे काम करू लागले. भौतिकशास्त्रात त्यांनी मोलाची कामगिरी केली. म्हणून महान शास्त्रज्ञ अशी त्यांची ओळख आहे.



ट्रिनिटी कॉलेजचे प्रवेशद्वार

ट्रिनिटी कॉलेजमध्ये प्राध्यापक हार्डी हे गणिताचे प्राध्यापक होते. भारतातील श्रीनिवास रामानुजन यांच्या गणित प्रतिभेबद्दल जेव्हा त्यांना कळले तेव्हा त्यांनी रामानुजनाला केंब्रिजला पाचारण केले. फारसे इंग्रजी येत नाही, कधी परदेश प्रवास केला नाही अशा परिस्थितीत बोटीचा प्रवास करून रामानुजन केंब्रिजला पोहोचले. तेथे

प्राध्यापक हार्डी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधन चालू ठेवले. जेवढा काळ ते राहिले त्या अल्पावधीत गणिताची अनेक भूलभूत तत्वे त्यांनी शोधून काढली. दुर्दैवाने त्यांना क्षयाने गाठले. क्षयग्रस्थ अवस्थेत त्यांना भारतात परत यावे लागले. त्यानंतर अल्पावधीतच त्यानी इहलोकाची यात्रा संपविली. हा इतिहास मुलांच्या दृष्टीने नवीन होता. बऱ्याच जणांना रामानुजन हे नाव माहीत होते. परंतु त्यांच्या कार्यासंबंधी माहिती नव्हती. त्याचबरोबर ते इंग्लंडच्या केंब्रिज विद्यापीठात होते याची तर त्यांना मुळीच कल्पना नव्हती. सहलीवरुन आम्ही परत जेव्हा आमच्या राहण्याच्या ठिकाणी आलो तेव्हा न्यूटन आणि रामानुजन हेच आमच्या चर्चेचे विषय होते. संधी साधून या दोन महान शास्त्रज्ञांच्या जीवनकार्याची माहिती आम्ही त्यांना दिली.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

## वस्तूंची मोफत साठवणूक

आंतरराष्ट्रीय विमानतळ व जहाजांची बंदरे येथे विशिष्ट जागेत कलेच्या कोणत्याही वस्तू, पुरातन वस्तू व दागिने यांची कोणताही कर न भरता साठवणूक करता येते. अशा जागांचा हेतू पैशांची अडचण दूर करणे हा असतो. अशा अडचणी आयात निर्यातीशी संबंधित असतात. या भागांमध्ये वस्तू बनविणे व वस्तूंवर प्रक्रिया करणे यास परवानगी असते. मात्र अशा जागेतून वस्तू जेव्हा देशात, शहरात हलवल्या जातात, तेव्हा त्या कस्टमच्या क्षेत्रात येतात व त्यावर कर भरावा लागतो.

अशा प्रकारच्या विनामूल्य साठवणूकीच्या जागा इंग्लंड, अमेरिका व इतर अनेक देशांत आहेत. अशा प्रकारच्या सोयीमुळे व्यापारी, निर्यातदार यांची सोय होते व वस्तू घाई घाईने हलवाव्या लागत नाहीत. वस्तू हलवण्याची सोय झाल्यानंतर या जागेतून त्या नेता येतात.

<u>संदर्भ</u> : एफ. टी. वेल्थ
मे २०१२ पृ.२१.

असं म्हणतात की सत्ता माणसाला भ्रष्ट बनवते. पण भ्रष्ट व्यक्तीच सत्तेकडे आकर्षित होतात. हे त्याहून मोठे सत्य आहे. - डेविड ब्राऊन

# बौध्दिक संपदा, पेटंट आणि पारंपरिक ज्ञान अंकीय ग्रंथालय

*बौध्दिक संपदा, पेटंट व पारंपरिक ज्ञान अंकीय ग्रंथालय याचे मुद्देसूद वर्णन या लेखात आले आहे. पेटंट या विषयाला असणारे महत्व लक्षात घेता या लेखात आलेली पेटंटच्या इतिहासाची माहिती नक्कीच उपयुक्त आहे. – संपादक*

## प्रस्तावना

दृष्य आणि अदृष्य हे संपत्तीचे वर्णन असते. इमारत, वाहन इ. डोळ्यांसमोर दिसणाऱ्या वस्तू या दृष्य संपत्तीमध्ये जमा होतात. पण सर्जनशील मनाच्या एखाद्या माणसाने आपल्या बुध्दी व कल्पनेच्या जोरावर निर्माण केलेली एखादी कलाकृती, तसेच मनातील भावनांचे कल्लोळ ही अदृश्य संपत्ती असते. स्थावर जंगम अशा दृष्य संपत्तीवर जसा एखाद्याचा मालकी हक्क असतो तसाच, नव्या कल्पना, शोध व कृतीवरही कर्त्याचा मालकी हक्क असला पाहिजे. यालाच बौध्दिक संपदा हक्क (Intellactual Property Right) असे म्हटले जाते.

## संपदा

संपदा म्हणजे मालमत्ता, संपत्ती किंवा मौल्यवान वस्तू, संपत्तीचे वर्गीकरण स्थावर व जंगम असेही करता येते. जमिनीशी संबंधित किंवा जमिनीवर बांधलेल्या मिळकतींना स्थावर मालमत्ता असे म्हणतात. उदा. शेती, घर इ. या व्यतिरिक्त असणारी मालमत्ता ही जंगम होय. उदा. सोने, गाडी इ.

## बौध्दिक संपदा

मानवी मनाच्या व बुद्धीच्या मदतीने निर्माण झालेली मालमत्ता म्हणजेच बौध्दिक संपदा होय. तिचा आविष्कार औद्योगिक, तसेच शास्त्र, साहित्य किंवा कलेच्या प्रांतात होतो. जागतिक बौध्दिक संपदा संघटन (World Intellectual Propewerty Organisation-WIPO) यांनी बौध्दिक संपदेची व्यापक व्याख्या केली आहे. त्यात खालील बाबींचा समावेश केला जातो.

१. साहित्य, कला व शास्त्रीय कार्य.
२. मानवी प्रयासाच्या सर्व क्षेत्रांतील शोध.
३. कला सादर करणारे कलाकार.
४. औद्योगिक संकल्पचित्र व नकाशे.
५. शास्त्रीय शोध.
६. व्यापारी चिन्हे व सेवा चिन्हे.
७. अयोग्य व अन्याय्य स्पर्धेपासून संरक्षण.
८. बौध्दिक कार्यामुळे निर्माण होणारे इतर सर्व हक्क.

## बौध्दिक संपदा हक्क

मानवाने आपल्या बुध्दीने, चिंतनाने व प्रयत्नाने नवनवीन गोष्टी शोधून काढल्या. त्यापासून तयार होणाऱ्या वस्तू व सेवा यामुळे समाजाचे जीवन अधिक सुखी होऊ शकते. परंतु शोध लावण्यासाठी बौध्दिक संपदा हवी व ती सगळ्यांकडे नसते. ज्यांच्याकडे ती आहे त्यांनी तिचा उपयोग करावा, शोध लावावेत. यासाठी शोधकर्त्याला त्यापासून काही आर्थिक लाभ मिळायला हवा. तशी हमी असायला हवी. यासाठी कायद्याने शोधकर्त्यास दिलेल्या अधिकारास 'बौध्दिक संपदा' असे म्हटले जाते. हे अधिकार किंवा हक्क कायदेशीर तरतुदी व कारवाईने अस्तित्वात येतात. अन्य कोणत्याही मालमतेप्रमाणे ते विकता येतात, तसेच भाड्यानेही देता येतात.

पुढील काही कारणांसाठी बौध्दिक संपदा हक्क प्रदान केले जातात.

१. शोधकर्त्यास सामाजिक व कायदेशीर मान्यता देणे.

२. शोध लावण्यासाठी व्यक्ती व संस्था यांना प्रोत्साहन देणे.
३. बौध्दिक संपदा धारकांना आर्थिक बक्षिसाची खात्री देणे
४. मूळ व खऱ्याखुऱ्या उत्पादनाची उपलब्धता बाजारात राहील, याची खात्री देणे.
५. स्पर्धा वाढवणे.
६. देशाच्या विकासासाठी आवश्यक असणारे शोध सतत लागत राहतील, याची व्यवस्था करणे.
७. नक्कल करुन खोट्या मार्गाने शोधांचा आर्थिक लाभ उठवणाऱ्यांना शासन करणे.

### बौध्दिक संपदा हक्क देण्यास विरोध

समाजातील काही मंडळी हा हक्क देण्यास विरोध करतात. त्यांच्या मते कोणताही शोध केवळ एका शोधकर्त्याच्या प्रयत्नाने लागत नाही. त्या शोधाची वाट ही आधी लागलेल्या शोधांमुळे दिसू लागलेली असते. मग एकालाच हा हक्क का प्रदान करायचा? शिवाय ज्यांच्याकडे शोध लावण्याइतकी बौध्दिक संपदा आहे, त्यांनी सामाजिक दायित्वाचे भान राखायला हवे. त्यांनी स्वतःच्या आर्थिक लाभापेक्षा समाजहित जपले पाहिजे. मग हा हक्क हवाच कशाला?

### पेटंट

बौध्दिक संपदा हक्कांपैकी सर्वात जास्त चर्चा ज्याची होते, ती 'पेटंट'ची होय. मुख्यत्वेकरुन औद्योगिक हक्कांत याची गणना होते. पेटंट मिळवण्यासाठी शोधकर्त्याने स्वतः शोध लावलेला असणे आवश्यक आहे. नावीन्य असणे व शोधाची उपयुक्तता असणे या पायाभूत बाबी पेटंट मिळवण्यासाठी महत्वाच्या असतात.

#### ठळक वैशिष्टे

- शोध लावण्यासाठी पेटंटचा हक्क मिळतो. शोध घेण्यासाठी नव्हे. ''शोध म्हणजे शोधक उपाय (Inventive Steps) असलेले व आद्योगिक उपयोजन (Industrial Application) करता येणे शक्य असलेले नवीन उत्पादन किंवा प्रक्रिया होय.'' अशी व्याख्या भारतीय पेटंट कायदा कलम २(००)- २००२ नुसार निश्चित करण्यात आली आहे.
- मानवनिर्मित वस्तू, उत्पादने, प्रक्रिया यासाठी पेटंट मिळते.
- शोधात नावीन्य असावे व त्याचा व्यापारी तत्वावर उपयोग करता यायला हवा.
- एका शोधासाठी एकच पेटंट दिले जाते.
- पेटंट हा कायद्याने दिलेला हक्क आहे. त्यामुळे तो मिळवण्यासाठी शोधकर्त्याने आवश्यक ती कायदेशीर पूर्तता केलेली असली पाहिजे.

साधारणतः पेटंट पुढील दोन गोष्टींसाठी दिले जाते.

१. वस्तू पेटंट (Product Patent) : या प्रकारच्या पेटंटमध्ये शोधकर्त्याने शोधलेली नवीन वस्तू, पदार्थ, उपकरण, साधन, हत्यार, यंत्र यांच्या उत्पादनासाठीचा हक्क प्रदान केला जातो.
२. प्रक्रिया पेटंट (Process Patent) : या प्रकारच्या पेटंटमध्ये वस्तू तयार करण्याची प्रक्रिया किंवा पध्दती यांचा समावेश होतो.

### पेटंट मिळवण्याची पद्धत

#### पेटंट मिळवण्यासाठी -

१. शोधकर्त्याने शोध लावलेला असला पाहिजे.
२. सदर शोधाचा तपशील जाहीर करण्याची तयारी हवी.
३. शोधकर्त्याने कायद्यातील तरतुदींनुसार कागदपत्रांची पूर्तता करायला हवी.

### पेटंटचा इतिहास

पेटंट कायद्याची सुरुवात इटलीपासून झाली. नवीन शोधून काढलेले उपकरण प्रत्यक्षात उपयोगात आणल्यावर त्या शोधाच्या हक्काला संरक्षण मिळावे, या हेतूने इटलीमध्ये इ. स. १४७४ मध्ये व्हॅटिकन कायदा (Vatican Statute) करण्यात आला. इंग्लंडमध्ये मक्तेदारी कायदा (Statute of Monopoly) इ.स.१६२३ मध्ये करण्यात आला. पुढे हाच विकास पावून त्याचाच पेटंट कायदा झाला. इ.स. १७९० मध्ये अमेरिकेने पेटंट कायदा मंजूर केला.

भारतात पेटंटसंबंधी पहिला कायदा इ.स.१८५६ मध्ये मंजूर करण्यात आला. तो इ.स.१८७२ मध्ये 'पेटंट ॲण्ड डिझाईन प्रोटेक्शन ॲक्ट' या नावाने सुधारितरूपात मंजूर करण्यात आला. इस.स.१८८८मध्ये 'इनव्हेंशन ॲण्ड डिझाईन्स ॲक्ट' या नावाने तो स्वीकारण्यात आला. त्यानंतर 'इंडियन पेटंटस् ॲण्ड डिझाईन्स ॲक्ट' इ.स.१९११ मध्ये आला. सुधारित कायदा हा इ.स. १९७२ मध्ये आला.

सुरुवातीला पेटंटविषयी जागतिक स्तरावर काहीच व्यवस्था नव्हती. एका देशात पेटंट मिळाले तरी दुसऱ्या देशात तेच मिळवण्यासाठी पुन्हा पहिल्यापासून कागदपत्रांची पूर्तता करावी लागे. यात वेळ, श्रम व पैसा वाया जाई. यासाठी एकापेक्षा जास्त देशांसाठी एकत्रित पेटंट व्यवस्था करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या.

इ. स. १९७३ मध्ये म्यूनिक येथे युरोपियन पेटंट कन्व्हेन्शन (EPC) वर चर्चा करून त्याची अंमलबजावणी इ.स. १९७८ पासून करण्यात आली. इ.स. १९८६ मध्ये गॅट कराराची आठवी चर्चा फेरी उरुग्वे येथे सुरू झाली. त्यात बौध्दिक संपदा हक्क हा विषय समाविष्ट करण्यात आला. इ.स.१९९१ मध्ये आलेल्या डंकेल मसुद्यात याचा समावेश करण्यात आला व त्याला मान्यता मिळून इ.स.१९९४ मध्ये ट्रिप्स (Trade Related Intellectual Property Rights - TRIPS) करार अस्तित्वात आला. या करारातील शर्तींनुसार भारतालाही आपला पेटंट कायदा इ.स.२००५ पर्यंत 'पेटंट ॲमेंडमेंट ॲक्ट' मंजूर करून बदलावा लागला. त्यांतील काही बदल असे आहेत.

१. ज्या शोधांचे सार हे अन्नपदार्थ, औषधे, औषधी द्रव्ये म्हणून वापरता येते, त्यांना पूर्वी केवळ 'प्रक्रिया पेटंट' देण्याची तरतूद होती. आता त्यासाठी 'उत्पादन पेटंट' देण्याची सोय करण्यात आली आहे.

२. प्रक्रिया पेटंटचा कालावधी, अन्नपदार्थ, औषधी द्रव्ये यांच्यासाठी पेटंट मिळाल्यापासून ५ वर्षे किंवा अन्य शोधांसाठी १४ वर्षे होता. तो आता सरसकट २० वर्षे करण्यात आला आहे.

३. भारतीय पेटंट कायद्यानुसार पूर्वी पेटंटचे उल्लंघन प्रतिवादीने केले आहे. हे पुराव्यांने सिध्द करण्याची जबाबदारी पेटंट धारकाची होती. आता ती जबाबदारी प्रतिवादीच्या माथी मारण्यात आली आहे.

### पारंपरिक ज्ञान अंकीय ग्रंथालय (Traditional Knowledge Digital Library - TKDL)

भारतासारख्या देशात बौध्दिक संपदा भरपूर असली तरी संपदेचा 'हक्क' करण्याची मनःस्थिती कधीच नव्हती. किंबहुना ज्याच्याकडे अशी संपदा असेल त्याच्यावर त्या संपदेचे समाजासाठी उपयोजन करण्याचे मोठे 'दायित्व' होते. आधुनिक स्पर्धात्मक युगात हे 'दायित्व' जाऊन 'हक्क' आला आहे. परंपरागत ज्ञान आपलाच शोध आहे. असे भासवून पेटंट घेण्याची परदेशांत जणू काही चढाओढच सुरू आहे. अशी पेटंटस् मुळात देतातच कशी, याचा शोध घेतल्यावर लक्षात आले की अमेरिकेत पेटंटसाठी अर्ज केल्यावर त्यांच्या कचेरीतील Elactronic Database मध्ये, 'अर्जित शोधाला पेटंट दिले नाही' एवढेच पाहून हरकती योग्य व समाधानकारक असल्यास पेटंटचा

पुनर्विचार केला जातो. ही प्रक्रिया समजल्यावर भारतात परंपरागत ज्ञानाच्या संरक्षणासाठी वेगळा विचार करण्याची गरज भासू लागली. त्यातूनच TKDLचा उगम झाला. परंपरागत ज्ञानाचे भलत्यालाच पेटंट मिळू नये यासाठी पुढील बाबींबाबत विचार करण्यात आला.

१. परंपरागत ज्ञान, जे मोठ्या प्रमाणात मौखिक स्वरूपात आहे किंवा स्थानिक भाषेत लिहिलेले आहे, ते सर्व प्रमाणित भाषेत लिखित स्वरुपात संकलित केले पाहिजे.
२. हे संकलित केलेले ज्ञान Elactronic Media मध्ये आणून अन्य सर्व देशांच्या पेटंट ऑफिसमध्ये पाठवले पाहिजे.

CSIR च्या अहवालानुसार, २००० पर्यंत एकट्या अमेरिकेच्या पेटंट कार्यालयाने औषधी वनस्तींना ४८९६ इतकी पेटंटस् दिली. त्यात ८० टक्के भारतीय वनस्पती होत्या. कडुलिंब, हळद, बासमती तांदूळ यांची चुकीच्या पध्दतीने दिली गेलेली पेटंटस् नंतर महत्प्रयासाने रद्द करवून घेण्यात भारताला यश आले. मात्र या प्रक्रियेमध्ये ५ ते ७ वर्षांचा कालावधी जातो व सुमारे १ व ते ३ कोटी रुपये इतका खर्च येतो. TKDL शिवाय इतका कालावधी व खर्च प्रत्येक पेटंटसाठी देणे अशक्य झाले असते.

भारताने युरोपियन पेटंट ऑफिसबरोबर अलीकडेच एक करार केला आहे. त्यानुसार TKDL ची माहिती (Database) आता ३४ युरोपियन देशांकडे उपलब्ध असेल. पेटंटसाठी कोणताही अर्ज आल्यास त्यातील शोध भारतीय वैद्यक किंवा औषधव्यवस्थेत यापूर्वी ज्ञात आहे का? याची खातरजमा या डेटाबेसवरून सहज करता येईल. आतापर्यंत TKDL मध्ये आयुर्वेदात ८१०००, युनानीतील १४०००० व सिध्द या उपचार पध्दतीतील १२००० औषधांची (Formulations) तपशीलांसह नोंद करण्यात आली आहे.

TKDL हा प्रकल्प संयुक्तपणे पुढील संस्थांनी हाती घेतला आहे.

१. CSIR - Council for Scientific and Industrial Research.
२. केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाचा 'आयुष' विभाग.
३. विज्ञान व जैव तंत्रज्ञान मंत्रालय.

## सारांश

मानवी मनाच्या बुद्धीच्या मदतीने निर्माण झालेली मालमत्ता म्हणजेच बौध्दिक संपदा होय. बौध्दिक संपदा हक्कांपैकी सर्वात जास्त चर्चा ज्याची होते, ती 'पेटंट'ची होय. भारतासारख्या देशात बौध्दिक संपदा भरपूर असली तरी संपदेचा 'हक्क' करण्याची मनःस्थिती कधीच नव्हती. आधुनिक स्पर्धात्मक युगात हे 'दायित्व' जाऊन 'हक्क' आला आहे. भरतात परंपरागत ज्ञानाच्या संरक्षणसाठी वेगळा विचार करण्याची गरज भासू लागली. त्यातूनच TKDL चा उगम झाला. भारताने युरोपियन पेटंट ऑफिसबरोबर अलीकडेच एक करार केला आहे. त्यानुसार TKDL ची माहिती आता ३४ युरोपियन देशांकडे उपलब्ध असेल. हाही प्रगतीचा एक मोठा टप्पाच मानावा लागेल.

## संदर्भ


१. गोविलकर वि. म., बौध्दिक संपदा अधिकार, पुणे, डायमंड, २००९, पृ. ११२
२. Wadehra B. L. Intellectual Property Law Handbook, Delhi : Universal, 2002, P. 614



प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये, ग्रंथपाल
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय, आयरे मार्ग,
दत्तनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८
smathalye42@gmail.com.


●●●

'भूतकाळात जास्त काळ रमू नका, भविष्यात फारसे डोकावू नका, आताच्या क्षणावर तुमचे मन केंद्रित करा.' -गौतम बुद्ध

# स्वामी विवेकानंदांनी आपल्या विविध भाषणातून व्यक्त केलेले विचार

लेखांक-१

*स्वामी विवेकानंदांच्या प्रेरक विचारांचा परिचय या लेखात करुन दिला आहे.*

हिंदू धर्माची सामान्य आणि व्यापक तत्वे कोणती हे ठरविण्याच्या दृष्टीने स्वतः हिंदू धर्मच एका सर्वोच्च प्रतीच्या हिंदू मनाच्या अनुशीलनाचा विषय झाला आहे. स्वतःच्या धर्मासंबंधी आपण बाळगीत असलेल्या आपल्या धारणा बरोबर आहेत किंवा नाही, हे पडताळून पाहण्यासाठी हिंदू माणसे पूर्वजांचा धर्म काय होता हे लक्षात आणून घेण्यासाठी स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीकडे वळतील. हिंदू धर्माला स्वतःच्या ज्ञानाचा साठा एकत्र आणि सुसंघटित करण्याची आवश्यकता होती. जिला सत्तेचे भय नाही, अशा धर्मश्रध्देची जगाला आवश्यकता होती. स्वामी विवेकानंदांच्या संदेशाने ही दोन्ही कार्ये साधली.

स्वामीजींच्या मुखावाटे अखिल भारतीय आध्यात्मिक अस्मिताच प्रगट झाली. स्वामीजींच्या कथनात त्यांचे स्वतःचे काहीही नसे. त्यांच्या भाषणात वेदांमधील उपनिषदांतील शिकवणच असे. भारताचे आध्यात्मिक धन त्यांनी उघडे करुन दाखविले. स्वामीजींच्या अभावी हजारो शास्त्र वचने दुर्बोध वादविवादाचे विषय राहिले असते. स्वामीजींनी या शास्त्रवचनाला जीवन रसायन पुरविणारे बनविले. त्यांनी ती अधिकार वाणीने विशद केली. ज्या गोष्टींचा त्यांनी प्रचार केला. त्या गोष्टींच्या अनुभूतीचा त्यांनी स्वतः तळ गाठला होता. एकमेव अद्वितीय अशा अनुभूतीचा त्यांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचे सार्वभौमत्व घोषित केले. तसेच द्वैत, विशिष्टाद्वैत द्वैताद्वैत, शुध्दाद्वैत या साऱ्या गोष्टी एकाच लक्षाच्या दिशेने होत असलेल्या प्रगतीच्या अवस्था वा टप्पा होत. अद्वैत हा शेवटचा टप्पा. तोच अंतिम लक्ष्य होय.

भगिनी निवेदिता म्हणतात - शास्त्र, श्रीगुरु आणि मातृभूमी या तीन सुरांनी मिळून विवेकानदांच्या साहित्याचे संगीत निर्माण झाले आहे. हीच त्यांना जगाला द्यावयाची संपदा होय.

**शिकागो येथील सर्वधर्म परिषदे समोर दिलेले व्याख्यान (११/९/१८९३)**

अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूनो,

आज तुम्ही जे आमचे हृदयापासून आणि अगत्याने स्वागत केलेत त्यास उत्तर देण्यासाठी मी येथे उभा आहे. शब्द सुचत नाहीत. हृदय अवर्णनीय आनंदाने भरुन येत आहे. जगातील सर्वात प्राचीन अशा संन्यासी समाजातर्फे मी तुम्हांला धन्यवाद देतो. नाना धर्मांचे उगम स्थान जो सनातन हिंदुधर्म, त्याचा प्रतिनिधी या नात्याने मी तुम्हास धन्यवाद देत आहे, आणि अधिक काय बोलू, अवघ्या पृथ्वीच्या पाठीवरील सर्व वर्णांच्या व सर्व संप्रदायाच्या कोटि कोटि हिंदु नर नारींच्या वतीने मी आज तुम्हाला धन्यवाद देत आहे.

याच व्यास पीठावरुन पूर्वेकडील प्रतिनिधी विषयी बोलताना काही सामान्य वक्त्यांनी असे मत प्रगट केले आहे की दूरदूरच्या देशातून आलेले हे प्रतिनिधी, सर्वत्र सहिष्णुतेचा भाव पसरविणारे म्हणून गौरवास पात्र होत यात काहीच संशय नाही. या वक्त्यांचेही मी आभार मानतो.

जो धर्म समस्त जगताला सहिष्णुता आणि सर्वच मतांना मानतो. या दोहोंचीही शिकवण निरंतर देत आला आहे. त्या धर्मात जन्मास आल्याबद्दल मला गौरव वाटतो.

'एखाद्या राष्ट्राची संस्कृती तेथील नागरिकांच्या हृदय आणि मनात बसलेली असते.' - महात्मा गांधी

अन्य धर्मियां विषयी आम्ही केवळ सहिष्णुताच बाळगतो असे नव्हे. तर सर्वच धर्म सत्य आहेत. असा आमचा दृढ विश्वास आहे. परकीयांच्या छळामुळे देशोधडीस लागलेल्या कोणत्याही जातीच्या कोणत्याही धर्मांच्या निराश्रिताला ज्या जातीने सर्वदा आश्रय दिला आहे. त्या जातीत जन्मास आल्याबद्दल मला अभिमान वाटतो. ज्या वर्षी रोमनांच्या निष्ठुर अत्याचारांनी यहुदी लोकांची पवित्र देवालये भग्न होऊन मातीस मिळाली, त्याच वर्षी काही जातिवंत यहुदि आश्रयार्थ दक्षिण भारतात आले असता माझ्याच जातीने त्यांना सादर हृदयाशी धरले. हे सांगताना मला भूषण वाटत आहे. वैभवशाली पारशी जातीच्या उरलेल्या लोकांना ज्या धर्माने आसरा दिला आणि आजही जो धर्म त्यांचे प्रतिपालन करीत आहे, त्याच धर्मात मी जन्मास आलो आहे. बंधूनो लक्षावधी हिंदू नरनारी ज्या स्तोत्राचा प्रतिदिनी पाठ करतात आणि जे मी अगदी लहानपणापासून म्हणत आलो आहे त्याच स्तोत्रातील काही ओळी मी आज तुमच्या समोर उद्धृत करतो.

''रूचीणां वैचित्र्यात् ऋजु कुटिल नाना पथजुषां। नृणां एको गम्यःत्यमसि पयसांअर्णव इव।'' भिन्न भिन्न उगमांतून निघणारे विभिन्न जल प्रवाह ज्याप्रमाणे अंती सागरास मिळून एक होऊन जातात, त्याचप्रमाणे रुचि वैचित्र्यानुसार वेगवेगळ्या सरळ वा वक्रमार्गांनी जाणारे सर्वपथिक प्रभो अंती तुलाच येऊन मिळतात.

गीतेत, भगवान कृष्ण उद्घोषित करतात-

**ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहं। मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।**

कुणी कोणत्याही भावाचा आश्रय घेऊन मज प्रत येईना का मी त्याच भवाने त्यावर अनुग्रह करीत असतो. अर्जुना लोक चोखाळीत असलेले निरनिराळे मार्ग अखेरीस मलाच येऊन मिळतात. आजची ही अपूर्व महिमाशाली सर्वधर्म परिषद वरील उदात्त सत्य अवघ्या जगासमोर जाहीरपणे प्रस्थापित करीत आहे.

पंथाभिमान, स्वमतान्धता आणि तज्जन्य अनर्थकारी धर्मवेड यांनी या आपल्या सुंदर वसुंधरेवर दीर्घकाळ अंमल गाजविला आहे. त्यांनी जगामध्ये अनन्वित अत्याचार माजविले असून कितीदा तरी ही पृथ्वी नररक्ताने न्हावून काढली आहे. संस्कृतीचा विध्वंस करून त्यांनी कधी कधी राष्ट्रेची राष्ट्रे हताश करुन सोडली आहेत. हे भयंकर राक्षस नसते तर मानव समाज आज आहे त्यापेक्षा किती तरी अधिक उन्नत होऊन गेला असता. पण आता त्यांचीही घटका भरली आहे आणि मला अशी उत्कट आशा वाटते की या धर्मपरिषदेच्या सन्मानार्थ आज प्रातः काली निनादित झालेला घंटानाद समूळ धर्मवेडाची, धर्मांच्या नावाखाली शस्त्राने वा लेखणीने केल्या जाणाऱ्या सर्वप्रकारच्या छळाची आणि एकाच लक्ष्याकडे आपआपल्या मार्गांनी जात असलेल्या व्यक्तीतील एकमेकांविषयीच्या असुहिष्णुतेच्या समस्त भावनांची मृत्यू घंटाच ठरेल.

### हिंदूधर्म

हिंदूना अपौरुषेय वेदापासून धर्मप्राप्त झाला. वेद हे आदी व अंत रहित आहेत. वेद म्हणजे विशिष्ट पुस्तके असा अर्थ नाही. भिन्न भिन्न व्यक्तींनी भिन्नभिन्न समयी ज्या आध्यात्मिक सत्यांचा शोध लावला त्यांच्या चिरसंचित कोषांनाच वेद असे नाव आहे. मानवाला ज्ञान होण्यापूर्वीही गुरुत्वाकर्षणाचा नियम आपले कार्य करीत होता. आणि संपूर्ण मानव जातीला त्याचा विसर पडला तरी तो आपले कार्य बजावीत होता, आध्यात्मिक नियमांचेही असेच आहे. जीवात्म्याचे इतर जीवात्म्याशी आणि सर्व जीवात्म्याचे त्या परम पिता परमात्म्याशी जे सारे दिव्य विशुध्द संबंध आहेत ते सर्व त्यांचा शोध लावण्यापूर्वी विद्यमान होते आणि आपल्याला त्यांचा विसर पडला तरीही आहेत तसेच राहातील.

'कॉलेज किंवा विद्यापीठांमध्ये मिळणाऱ्या शिक्षणापेक्षा लहानपणी मिळणारे नीतीमूल्यांचे धडे आणि प्राथमिक शिक्षण खूप महत्त्वाचे असते.' - डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

या अध्यात्मिक नियमांचा शोध लावणाऱ्यांना ऋषी अशी संज्ञा आहे. सर्वज्ञ आणि पूर्णत्व पावलेल्या विभूति मानून आम्ही त्यांना सन्मान देत असतो. यात काही स्त्रियाही होत्या हे सांगताना मला अत्यंत आनंद होत आहे. वेद घोषणा करतात की सृष्टीला आदी व अंत नाही.

### पूर्वजन्म

सध्या मी इंग्रजीत बोलत आहे. ती काही माझी मातृभाषा नाही. तरी देखील मी इंग्रजी बोलत असताना मातृभाषेतील एकही अक्षर माझ्या मनात हजर नाही. पण मी जर आठवण्याचा यत्न करीन तर तत्क्षणी ते माझ्या स्मृतिपटलावर चमकू लागतील. यावरुन हेच दिसून येते की मनः सागराच्या केवळ पृष्ठावर जे काय हेलकावत राहाते त्याचाच फक्त आपल्याला बोध होत असतो आणि आपली पूर्वार्जित ज्ञानराशी त्याच समुद्राच्या अगाध गर्भात दडलेली असते. प्रयत्न पूर्वक साधनेद्वारा तिला वर आणता येते आणि मग याच काय, पण पूर्व पूर्व-जन्मांची देखील स्मृति आपल्या अन्तःकरणात जागृत होईल. पूर्व जन्मासंबंधी हेच साक्षात प्रमाण होय.

### सारांश

आपण आत्मा आहोत असा हिंदूंचा विश्वास आहे. शस्त्र त्या आत्म्याला छिन्न करू शकत नाही, अग्नि दग्ध करु शकत नाही, जल आर्द्र करु शकत नाही व वायु शुष्क करु शकत नाही. आत्मा एक वर्तुळ आहे. ज्याचा परीघ कुठेच नाही. परंतु ज्याचे केंद्र प्रत्येक देहात अवस्थित आहे आणि त्या केंद्राचे एका देहातून दुसऱ्या देहात गमन म्हणजेच मृत्यू.

वेद सांगतात आत्मा स्वरुपतः ब्रह्म आहे. तो पंचभूतांच्या बंधनात सापडला आहे. त्या बंधनातून मोकळा होताच तो पूर्ववत् पूर्णत्वास प्राप्त होतो. या अवस्थेचे नावच मुक्ती. मुक्ती म्हणजे अपूर्णता, जन्ममृत्यू, आधिव्याधी वगैरेंच्या कचाट्यातून सुटका. जेव्हा परमात्म्याची कृपा होते. तेव्हा शुध्द पवित्र हृदयात तो प्रकाशतो. ह्या निर्मळ विशुध्द मानवाला याच जीवनात त्याचे दर्शन होते. तेव्हाच समस्त कुटिलता नाश पावते. संदेह दूर होतात. समग्रकर्माचा क्षय होऊन कर्म फलाच्या तावडीतून तो पूर्ण सुटतो. हेच हिंदु धर्माचे लक्ष्य आहे. हाच हिंदु धर्माचा यथार्थ भाव आहे. हिंदुधर्माचा मूलमंत्र केवळ विश्वास ठेवणे नव्हे तर जीवनात उतरविणे. (सर्व धर्म परिषदेसमोर वाचलेला निबंध १९.९.१८९३)

### कर्मयोग

कृ-करणे, जे काही केले जाते ते सारे कर्म. पारिभाषिक अर्थ कर्मफल, कर्मयोगात कर्म शब्द कार्य या अर्थी आहे. मानव जातीचे चरम वा अंतिम लक्ष्य ज्ञान लाभ. सुखाला परम गति समजणे हा माणसाचा निखालस भ्रम होय.

या जगात जेवढे म्हणून ज्ञान आजतागायत उपलब्ध झाले आहे ते सारेच्या सारे मनातूनच आविर्भूत झालेले आहे. विश्वाचे अनंत ग्रंथालय आपल्या मनातच विद्यमान आहे. बाह्य जगत हे केवळ एक उद्दीपक कारण. केवळ ज्ञानच नव्हे तर आपल्या सगळ्या भावनांना आणि सगळ्या कार्यांना देखील लागू पडेल. शांतपणे विचार केल्यानंतर हे ध्यानात येईल की आपल्या मनावर बाह्य जगताने केलेल्या अगणित घात प्रत्याघातातूनच हे सारे उद्भूत होत आहेत. या समस्त आघातांना मिळून कर्म म्हणत असतात. आत्म्यातील अंतस्थ अग्नीला बाहेर प्रगट करण्यासाठी आत्म्याची शक्ती व ज्ञान प्रगट करण्यासाठी जो जो मानसिक वा भौतिक आघात केला जात असतो. तो प्रत्येकच कर्म होय. येथे कर्म शब्द अत्यंत व्यापक अर्थाने वापरण्यात आला आहे. या दृष्टीने बघितल्यास आपण सारेजण सदासर्वदाच कर्म करीत आहोत. सारी कर्मे आमच्यावर स्वतःचा ठसा ठेवून जात असतात.

माणसाला आयुष्यात जेवढ्या म्हणून शक्तींना हाताळावे लागते. त्यापैकी मानवी चरित्र्य घडविणारी कर्म

---

शक्ती हीच सर्वापेक्षा अधिक प्रबल होय. मनुष्य हा जणू काही एक केंद्र असून जगातील समस्त शक्तींना तो आपल्याकडे आकर्षून घेत असतो. ह्या केंद्रातच त्याना वितळवून एकत्र मिसळत असतो. आणि मग एका खूप जोरदार प्रवाहाच्या रुपाने त्याना बाहेर सोडीत असतो. हे केंद्र म्हणजेच खरा मनुष्य. सर्वत्र शक्तिमान सर्वत्र आत्मा तो स्वतःकडे समस्त विश्व आकर्षित करत असतो. भलेबुरे सुखदुःख सारेच त्याच्या रोखाने चालले आहे. जाऊन त्याला चोहो बाजूनी बिलगत आहे. आणि त्या सामुग्रीतून चारित्र्य नावाच्या प्रवृत्तीचा एक महाशक्तीशाली स्त्रोत उत्पन्न करुन त्याला बाहेर फेकीत असतो. आकर्षून आत घेण्याची शक्ती असते तशीच त्याच्यात ती बाहेर टाकण्याची देखील शक्ती वसत असते.

सभोवार जी सारी कर्मे आढळत आहेत ती सर्व केवळ विचारांचाच बाह्य आविष्कार. माणसाच्या इच्छा शक्तीचा केवळ बहिःप्रकाश होय. ही इच्छा शक्ती चारित्र्यातून निर्माण होत असते आणि चारित्र्य कर्मांनी घडविले जाते म्हणून जशी कर्मे असतील तसाच इच्छा शक्तीचा बहिःप्रकाश व बाह्य आविष्कार असणार. सारे पुरुष श्रेष्ठ प्रबळ कर्मी होते. अवघ्या दुनियेची उलथापालथ करुन टाकण्या पुरती प्रचंड इच्छा शक्ती त्या कर्मवीर नरश्रेष्ठांच्या अंतरात सळसळत होती. ही शक्ती त्यानी युगानुयुगीचा सतत कर्मामधून मिळविली होती. बुध्द वा येशूसारखी प्रचंड इच्छा शक्ती काय एकाच जन्मात लाभणे संभवते? या शक्तीची उगम स्थाने युगानुयुगे कुठेतरी अस्तित्वात होती. क्रमशः अधिकाधिक प्रबळ होत होती आणि अंती समाजात ती बुध्ददेव वा येशूच्या रुपाने प्रबळ शक्तीच्या स्वरुपात प्रगट झाली. आजही तो शक्तिस्त्रोत प्रवाहित होतो आहे आणि हे सारे कर्माच्याद्वारा नियमित होत असते.

आम्ही कशाचे अधिकारी आहोत आणि आम्ही कोणती वस्तू ग्रहण करुन आत्मसात करु शकू ह्याचा निर्णय आमचे कर्मच करील. आपल्या वर्तमान अवस्थेला आपण स्वतःच जबाबदार आहोत आणि पुढे जे काय होण्याची इच्छा आहे ती देखील आपल्यात विद्यमान आहे. म्हणून भविष्यकाळी जसे बनण्याची आपली मनीषा आहे तसे आपण आपल्या चालू कर्मानीच बनू शकू. अतएव कर्म कसे करीत असावे हे आपण समजून घेणे आवश्यक आहे.

समस्त कर्माचा उद्देश-मनामध्ये जी शक्ती पूर्वीपासूनच वसत आहे. तिला प्रगट करणे, आत्म्याला जागृत करणे हाच होय. पूर्णशक्ती व पूर्ण ज्ञान प्रत्येकाच्याच अंतर्यामी वास करीत असतात आणि ही सारी भिन्नभिन्न कर्मे म्हणजे जणू काही त्यांना प्रगट करण्यासाठी, त्यांना जागे करण्यासाठी केलेले आघातच होत.

माणूस नाना हेतूनी प्रेरित होऊन कार्यास प्रवृत्त होत असतो. प्रत्येकाची आशा आकांक्षा वेगळी असते. कोणी किर्ती, कोणी धन, कोणी सत्ता, कोणी स्वर्ग लाभ अशा तऱ्हेतऱ्हेच्या कितीतरी हेतूने प्रेरित होऊन माणूस कार्य करण्यास उद्युक्त होत असतो.

आता कर्मासाठीच कर्म याचा विचार करू. केवळ लोकांचे कल्याण होईल म्हणून कर्म करणारे, गरीबावर उपकार, मनुष्य जातीला साहाय्य करण्याची व्रत दीक्षा घेऊन कार्यास प्रवृत्त होतात. कर्तव्याची तशी व्याख्या करणे कठीण आहे. जे कार्य कर्त्याला ईश्वराकडे घेऊन जाते तेच सत्कार्य अतएव कर्तव्य होय आणि जे कर्त्याला अधोगामी करते ते असत् कार्य व अकर्तव्य होय.

आपण जे कार्य करतो त्याचे मुख्य फल आहे आत्म शुध्दि. सर्वदा दुसऱ्यांचे कल्याण करण्याच्या प्रयत्नात आपण स्वतःला विसरुन जाण्याचा यत्न करीत असतो. आत्मविस्मृति ही जीवनात शिकण्यासारखी एक मुख्य गोष्ट आहे. हाच समस्त नीतीचा पाया होय. हा आत्म त्यागच नीतीप्रणालीतील एकमेव मूलतत्व होय. हाच त्यातील मुख्य मध्यवर्ती भाव होय.

---

सरधोपट मार्गाने जाऊ नका, त्यापेक्षा स्वतःचे मार्ग आखा आणि अशी वाटचाल करा की सर्वजण तुमचे अनुकरण करतील.' -राल्फ इमर्सन

मातृपक्ष जगतात सर्वश्रेष्ठ होय. कारण फक्त त्यातच सगळ्यात जास्त निःस्वार्थ ते धडे शिकून निःस्वार्थपणे कार्य करण्याची संधी सगळ्यात अधिक लाभत असते. केवळ एक भगवत् प्रेमच मातृ प्रेमापरीस उच्च होय. बाकी सर्वच खालच्या दर्जाचे आधी मुलाचे आणि नंतर आपण हा मातृ धर्मच होय.

**प्रवृत्ति व निवृत्ती**

प्रवृत्तीलाच संसार म्हणतात, मी व माझे ह्या 'मीला' धन संपत्ति, प्रभुत्व, नांव, यश वगैरे द्वारा सदा सर्वदा वाढविण्याचा यत्न करणे, मिळेल ते पकडून ठेवणे, ग्रहण करणे, सर्वदा सर्व वस्तू या 'मी' रुप केंद्रामध्ये जमविणे याचेच नांव प्रवृत्ती. ही प्रवृत्तीच मनुष्य मात्राचा स्वाभाविक भाव होय.

ज्यावेळी ते केंद्र म्हणजे, 'मी' ज्यावेळी ही वृत्ती लोपू लागते, ज्यावेळी निवृत्तीचा उदय होतो त्याच वेळी कुठे नीतीचा आणि धर्माचा प्रारंभ होतो. प्रवृत्ति व निवृत्ति दोन्ही कर्मच होत. एक असत् दुसरे सत्. ही निवृत्तीच समस्त नीतीचा व समस्त धर्माचा पाया आहे. आणि तिची पूर्णता म्हणजे संपूर्ण आत्म विसर्जन होय. दुसऱ्यासाठी शरीराचा मनाचा फार काय सर्वस्वाचा देखील होम करण्याची सतत तयारी. ही अवस्था लाभली तो कर्म योगात सिध्द होतो. सत्कर्माचे हेच सर्वोच्च फळ होय.

योग्य कर्माचे अनुष्ठान करण्यासाठी प्रथम आपण आसक्तीच्या भावनेचा त्याग केला पाहिजे. दुसरे कर्माच्या रामरगाड्यात स्वतःला गुरफटून घेऊ नका. त्याच्याशी एकरुप होऊन न बसता साक्षी स्वरुप राहून कर्म आचरित जा. आपण ज्यांना आपला म्हणून मानतो त्या सर्व गोष्टी वस्तुतः ह्या प्रभूच्याच होत. आपणावर कुणी अवलंबून आहे आणि आपण कुणाचे भले करु शकतो असे वाटणे अत्यंत दुर्बलतेचे लक्षण होय. अहंकाराचीही भावनाच सर्व प्रकारच्या आसक्तीचे उगम स्थान आहे. आणि आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या समस्त दुःख कष्टाची जननी ही आसक्तीच होय. एकही जीव या विश्व संसारातला आपल्यावर अवलंबून नाही. एक देखील भिकारी आपल्या भिक्षेवर अवलंबून नाही. एक ही प्राणी आपल्या दयेवर अवलंबून नाही. प्रकृति सर्वांना साहाय्य करीत असते.

तुम्ही कोणत्याही धर्माचे असा तुम्ही स्वार्थशून्य आहात की नाही, जर असाल तर मग एकही धर्म ग्रंथ न वाचता कोणत्याही प्रार्थना स्थळी न जाता देखील तुम्ही सिध्द होऊ शकाल. सत्कर्मासाठीच सत्कर्म आचरा. तेव्हाच कुठे संपूर्ण अनासक्ती लाभेल. मग समस्त हृदयग्रंथी छिन्न होऊन जातील. आणि आपल्याला पूर्ण मुक्ति प्राप्त होईल. ही मुक्तिच वस्तुतः कर्मयोगाचे ध्येय आहे आणि हेच कर्माचे रहस्य आहे.

एकाच अंतिम ध्येया प्रत जाऊन पोचणारे चार मार्ग- कर्म, भक्ती, योग व ज्ञान ही परस्पर पृथक् नाहीत केवळ प्राधान्याच्या दृष्टीने केलेले हे मार्ग आहेत. अंतिम लक्ष्य मुक्ती. सर्व प्रयत्न त्या साठीच.

विषमतेमुळेच जग प्रतिष्ठित आहे. अ-समानशक्ती घेऊन व आपण सारे या जगात पाऊल टाकत असतो. जो पर्यंत हे जग आहे तोवर विषमता ही राहणारच. सृजनासाठी वैषम्याची गरज तशीच वैषम्य घटविण्यासाठी होणारे प्रयत्न ही आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टीमुळेच सृष्टी टिकून राहाते. बंध-मोक्ष हे चालूच राहणार. या अजस्त्र यंत्रातून सुटण्याचे दोन मार्ग एक अलिप्तता दुसरा मार्ग कर्माचे रहस्य जाणून कर्म योगाचे आचरण करणे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

फक्त तार्किक आणि तात्त्विक विचार करणारे आयुष्यातला आनंद गमावतात. - विल्यम बटलर यीट्स

# महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारा

लेखांक-१

*Human Cycle या ग्रंथाच्या आधारे श्री अरविंदांनी व्यक्त केलेल्या समजाशास्त्रीय चिंतनाचा परिचय या लेखात आहे. या विषयावरील लेखमालेतील हा पहिला लेख आहे.*

The Crest-Jesel fo renaiscent India, the bravest among the patriots, the sharpest among the intellectuals and the subtlest among the seers असं ज्यांचं वर्णन केलं जातं, ते महायोगी श्री. अरविंद म्हणजे वेदकालीन ऋषी मुनींच्या परंपरेतील एक थोर आधुनिक महर्षी, एक उत्कृष्ट प्राध्यापक, शिक्षणतज्ञ, महान देशभक्त, थोर राजकीय नेते, आदर्श निर्भय पत्रकार, विविध योगमार्गांचा स्वतः अनुभव घेऊन त्यांचा समन्वय साधणारा महायोगी, वेद-उपनिषदातील चिरंतन तत्त्वांची सांगड आधुनिक विचारधारेशी घालून पृथ्वीतलावरील दिव्य जीवनाच्या मार्गाचा एक नवा विचारप्रवाह मांडणारा क्रान्तिकारक तत्त्ववेत्ता, आणि भावी काळातील काव्यरचना कशी असेल त्याचे दर्शन घडवणारा महाकवी.

श्री अरविंदांनी निर्माण केलेल्या विचार संपदेमध्येही आपल्याला याच विविधतेचं दर्शन घडतं. भारतीय संस्कृतीची श्रेष्ठ वैशिष्ट्ये दाखवणारा ''भारतीय संस्कृतीचा पाया'' हा ग्रंथ, आधुनिक मानवालाही मार्गदर्शक ठरणाऱ्या गीतेमधील चिरंतन, सर्वव्यापी तत्त्वांचा शोध घेणारे 'गीतेवरील निबंध', वेदमंत्रामागील गूढ अर्थाची उकल करून दाखवणारा "Secrets of the Vedas" हा ग्रंथ, उपनिषदावरील प्रवचने, सामाजिक व राजकीय विषयांवरील लेख; संस्कृत, बंगाली व ग्रीक भाषांतून केलेली भाषांतरे, शेकडो लघु आणि दीर्घ अशा काव्यरचना, मानवी समाजाच्या प्रगतीचा आलेख मांडून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्याची चिकित्सा करणारा "Human Cycle" हा ग्रंथ, विविध योगमार्गाच्या गुण-दोषांची चर्चा करून त्यांचा समन्वय साधण्यासाठी पूर्णयोगाचा मार्ग दाखवणारा "Synthesis of Yoga" हा ग्रंथ, आणि या सर्व अफाट विचार संपदेचे मेरुमणी शोभेल असा "Divine Life" हा ग्रंथराज आणि "Savitri" हे वैश्विक महाकाव्य ही ग्रंथ रचना समाविष्ट आहे.

महायोगी श्री अरविंदांच्या या उत्तुंग अशा व्यक्तिमत्वाचं आणि प्रतिभेचं दर्शन ज्यांनी अनुभवलं ती सर्व मंडळी त्यांच्यासमोर नतमस्तक झाली; परंतु अनेक आधुनिक विचारवंत आणि सर्वसामान्य समाज मात्र दुर्दैवाने या दर्शनापासून दूरच राहिले आहेत. अर्थात् असे का व्हावे तेही उघडच आहे. महायोगी म्हटला की तो या जगाकडे, जगाच्या प्रश्नांकडे, जगातील सौंदर्याकडे पाठ फिरवून अरण्यात नाहीतर एखाद्या गुहेत जाऊन बसतो आणि योगसाधना करुन स्वतःला मोक्ष, मुक्ती प्राप्त करून घेतो अशी आमची पारंपरिक सार्वत्रिक समजूत. त्यामुळे मानवास दुःखमुक्त करण्याच्या उद्दिष्टाने केलेला जीवनाभिमुख आणि जीवनस्पर्शी असा श्रीअरविंदाचा योग बहुसंख्याकांपर्यंत पोहोचू शकला नाही अथवा त्यांना त्या योगाचे आकलन होऊ शकले नाही. कदाचित याच कारणामुळे राष्ट्रीय शिक्षण, कला, काव्य, भारतीय संस्कृती, समाजशास्त्र, जागतिक ऐक्य इत्यादी विषयांवर श्री अरविंदांनी व्यक्त केलेल्या विचारांची फारशी दखल घेतली गेली नसावी.

असे असले तरी सध्याची देशातील आणि साऱ्या जगातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती पाहता श्री अरविंदांच्या समाजशास्त्रावरील विचारांकडे एक नजर टाकण्याची नितांत आवश्यकता आहे असे वाटते. परंतु

त्यांच्या एकूण विवेचनाचा पाया आणि विचारांची दिशा योग्य तऱ्हेने समजून घेण्यासाठी गेल्या १००/१५० वर्षांतील घडामोडींचा एक धावता आढावा घेणे क्रम प्राप्त आहे. तसेच समाजशास्त्राची प्रचलित दिशा टाळून योगी अरविंदांनी वेगळी वाट का व कशी अनुसरली तेही पहावे लागेल.

१८ व्या शतकापर्यंत जगाच्या पाठीवर सर्वत्र राजेशाही अथवा सरंजामशाही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पाय जमिनीत रोवून घट्ट उभी होती. १८ व्या शतकाच्या अखेरीस झालेले अमेरिकन स्वातंत्र्य युध्द आणि फ्रेंच राज्यक्रान्ती या दोन घटनांनी साऱ्या जगात लोकशाही विचारांचे वारे वाहू लागले. विसाव्य शतकात साम्यवादी राज्यव्यवस्था निर्माण झाल्या आणि शतक संपण्यापूर्वीच लोपही पावल्या. विसाव्या शतकात दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक छोटे मोठे देश स्वतंत्र झाले. काही ठिकाणी लोकशाही निर्माण झाली तर काही ठिकाणी लष्करी हुकूमशाही आली. जिथे लोकशाही निर्माण झाली आणि टिकून राहिली अशा भारतासारख्या देशातही या लोकशाहीत निर्माण होणाऱ्या अपप्रवृत्तींवर अंकुश कसा ठेवावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. हा अथवा अशा प्रकारचे अन्य प्रश्न सोडवण्यासाठी १०० प्रकारची उत्तरं समोर येत असतात. हा सारा वैचारिक गोंधळ का चालू असतो? कोणतीही एक पध्दत का यशस्वी होत नाही? या आणि अशा प्रकारच्या प्रश्नांवर भाष्य करताना श्री अरविंद म्हणतात.

" Life escapes from the formulas and the systems which our reason labours to impose on it; it proclaims itself too comples, too fule of infinite potentialities to be tyranised over by the arbitrary intellect fo man. This is the caouse why all human systems have failed in the end, for they have never been anything but a partial and confused application of reason to life".

श्री अरविंद म्हणतात की, मानवी जीवन हे खूप गुंतागुंतीचे आहे, समजण्यास कठीण आहे. त्याच्या ठीकाणी असणार अव्यक्त सामर्थ्य अमर्यादित आहे आणि यामुळे मानवी तर्कबुध्दी जेव्हा काही नियमांद्वारे त्याच्यावर बंधन लादू पाहते, तेव्हा ती बंधने झुगारून देऊन ते बाहेर पडते. श्री अरविंदांचा हा विचार इथे देण्याचा उद्देश एवढाच आहे की, त्यांच्या विचारांची दिशा व उंची ध्यानात यावी. एरवी मानवी तर्कबुध्दीचे महत्त्व आणि त्याच्या मर्यादा यांवर त्यांनी केलेले विवेचन वाचनीय आहे.

श्री अरविंदांचे विवेचन हे आधुनिका मनाला पटेल, रुचेल असे शास्त्रशुध्द आणि तर्कशुध्द पायावर आधारलेले आहे. भौतिक शास्त्राच्या मर्यादा ते आपणांस दाखवतात. भौतिक शास्त्राच्या काही शोधांमुळे मानवी जीवन जरी सुखकर झालं असलं तरी त्याची गुंतागुंतही वाढली आहे. हे नजरेस आणतात; पण भौतिक शास्त्रामुळे मानवी बुध्दी तीक्ष्ण झाली आहे आणि वरच्या पातळीवर गेली आहे. हे मान्य करताना ते म्हणतात-

"Science has enlarged the intellectual horizons of the raised, sharpened and intensified powerfully the general intellectual capacity of mankind" परंतु हे जरी खरं असलं तरी "Human Cycle" या ग्रंथाच्या आरंभी ते म्हणतात की, भौतिक शास्त्रांनी लावलेल्या काही शोधांनी सर्वांची मने व्यापून टाकली आहेत. भौतिकता आणि त्यांतील जड द्रव्य हेच एकमेव अस्तित्व आहे. अशी सर्वांची ठाम समजूत आहे. मानवाच्या मनाचा अभ्यासही भौतिक गृहीतांच्या पायावर करण्याचा प्रयत्न केला गेला. आणि विशेष म्हणजे मानसशास्त्राचा अभ्यासही शरीर विज्ञानाशी जोडला गेला आणि त्यासाठी मेंदू व मज्जासंस्था यांची छाननी केली जाऊ लागली. तात्पर्य, भौतिक विज्ञानाने जीवनाच्या सर्व अंगावर प्रभाव पाडला. साहजिकच, समाजशास्त्रही त्यांतून सुटले नाही. समाजाच्या प्रगतीचा आलेख मांडताना सारं लक्ष्य केन्द्रित

झालं ते बाह्य भौतिक बाबींवर. आजतागायत आपणही समाजरचनेचा आणि समाजाच्या प्रगतीचा इतिहास याच पध्दतीने अभ्यासत आलो.

अतिप्राचीन काळी 'अश्मयुग' होतं. माणूस कंदमुळे, फळे आणि प्राण्यांचे मांस खाऊन उपजीविका करत होता. या काळात आपलं शस्त्र म्हणून तो दगडांचा उपयोग करत होता. पुढे त्याला अग्नीचा शोध लागला; तेव्हा तो प्रथम मांस भाजून व पुढे शिजवून खाऊ लागला. त्याला लोखंड सापडलं आणि मग तो आपली शस्त्र लोखंडाची बनवू लागला. अशा तऱ्हेने लोहयुग सुरु झालं. अशा गोष्टींच्या जोडीला फारतर त्यांच वस्त्र प्रावरण काय होतं? घरं कशी होती, त्यांचे समूह कसे होते, समूहातील कायदे कसे होते, विवाह कसे होते आणि या संपूर्ण राहणीमानात हळूहळू फरक कसा पडत गेला इत्यादी बाह्य गोष्टींनाच अनन्यसाधारण महत्त्व दिलं गेलं. आणि त्यामुळे मानवाची मानसिकता, त्याच्या वैयक्तिक आणि सामाजिक भावना, त्याच्या कल्पनाशक्तीचा झालेला विकास इत्यादी गोष्टी समाजशास्त्राच्या अभ्यासात काहीशा गौण ठरल्या होत्या. श्री अरविंदांना हे पटत नव्हतं. मानव आणि मानवी समाज यांच्या प्रगतीचा आलेख मांडताना मानवाचं मन त्याची तर्कबुध्दी आणि त्यांच्या परस्परसंबंधातील भावनिकता यांना केन्द्रस्थानी ठेवूनच विचार करायला हवा. याशिवाय माणूस म्हणजे कोण त्याचा विचारही महत्वाचा आहे. श्री अरविंद म्हणतात-

"India has always seen the man, the individual as a soul, th divinity enwrapped in body and mind." या संपूर्ण पार्श्वभूमीवर श्री अरविंदांना असं आढळलं की कार्ल गेठार्ड लेम्प्रेच्ट (१८५६-१९१५) या एका जर्मन सामाजिक शास्त्रज्ञानं काहीशी वेगळी वाट चोखाळली आहे. मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा आलेख त्याने ५ टप्प्यांत मांडला. 1) Symbolic Age 2) Typal Age 3) Conventional Age 4) Individualistic Age आणि 5) Subjective Age. लॅम्प्रेच्टचे सर्वच विचार जरी श्री अरविंदांना पटले नाहीत तरी त्यांच्या लक्षात आलं की कोणत्याही संस्कृतीचा आलेख त्याने दाखवलेल्या टप्प्यांच्या आधारे मांडता येतो. या विशिष्ट टप्प्यांचा आढावा घेतल्यावर त्यांनी असाही सिध्दांत मांडला की मानवी समाजाची प्रगती ऊर्ध्व दिशेने, पण एका चक्राकार गतीने होत आहे.

तेव्हा अशा रीतीने, लॅम्प्रेच्टने प्रस्थापित केलेले मानवी सभ्यतेच्या प्रगतीचे टप्पे आणि प्रगतीची चक्राकार गती यांना आधारभूत धरुन श्री अरविंदांनी भारतीय सभ्यतेचा आलेख मांडला. युरोपीय सभ्यतेशी निरनिराळ्या टप्प्यांवर तुलना केली. मानवाची तर्कबुध्दी, धार्मिकता, आधुनिक शास्त्राने साधलेली प्रगती, संस्कृती आणि आध्यात्मिकता इत्यादी विषयांचा उहापोह केला आणि त्यातूनच Human Cycle हा ग्रंथ साकार झाला. या ग्रंथामधून योगी अरविंदांचे सामाजिक तत्त्वज्ञान साकार झाले आहे. मानवी सभ्यता आज कोणत्या टप्प्यावर आहे, तिची वाटचाल यापुढे कोणत्या दिशेने व्हायला हवी, तिचे अंतिम उद्दिष्ट कोणते इत्यादी गोष्टी जाणून घेण्यापूर्वी आपल्याला लॅम्प्रेच्टच्या पाचही टप्प्यांना भारतीय सभ्यतेच्या संदर्भात श्री अरविंदांनी दिलेला अर्थ आणि त्यांची केलेली मीमांसा समजून घ्यावी लागेल.

### सिम्बॉलिक एज अर्थात प्रतीकप्रधान युग :-

श्री अरविंद म्हणतात की जगाच्या पाठीवर कोणतीही संस्कृती घेतली तरी थोड्या फार फरकाने त्या संस्कृतीची प्राथमिक अवस्था प्रतीकप्रधानच असते. मग ती संस्कृती प्रगत असो वा मागासलेली असो. पण यात महत्वाचा प्रश्न निर्माण होतो तो हा की, मुळात या प्रतीकांचे स्वरूप काय होते? कोणत्याही समाजाची प्राथमिक अवस्था ही नेहमीच धार्मिक होती. कारण धार्मिकता ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे. ती कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही मार्गाने दडपता येणार नाही. धर्म ही अफूची गोळी आहे. असे

मानणाऱ्या रशियातील कम्युनिस्ट राजवटीने ५० वर्षे धार्मिकता दडपण्याचा प्रयत्न केला. चर्चेस बंद केली, शाळांतून धार्मिकतेच्या विरोधात शिकवण दिली. पण जेव्हा कम्युनिस्ट राजवट कोसळली आणि चर्चमधल्या घंटा वाजू लागल्या. तेव्हा हजारो लोक चर्चच्या दिशेने धावू लागले. असो.

उत्स्फूर्त अशी धार्मिक भावना आणि प्रतीकात्मता यांच अनादिकाळापासून एक अजोड असं नातं आहे. भारतीय सभ्यतेमधील प्राचीनतम अशा वेदकाळाकडे नजर टाकली तर त्या काळात सारं काही प्रतीकात्मक भाषेत व्यक्त होत असावं असं दिसतं. वेदवाङमयातील प्रतीकात्मतेचं दर्शन अलीकडच्या काळात स्वामी दयानंद, योगी अरविंद आणि ऋग्वेद भाष्यकार कपालीशास्त्री यांनी घडवल्यानंतर केवळ कर्मकांडापुरते मानले गेलेल्या वेदांतील विचारांची महती जाणवू लागली.

ही प्रतीकात्मकता केवळ धर्मग्रंथांपुरती मर्यादित नव्हती तर तिचा परिणाम संपूर्ण सामाजिक व्यवहारावर पडला होता. उदा. विवाह विधीतील मंत्र हे सूर्यदेवाची कन्या सूर्या हिच्या विवाहास उद्देशून म्हटले होते. आणि मानवी युगुलाला त्या दैवी युगुलाचे प्रतीक म्हणून मानलं जात असे. भारतीय संस्कृतीमधील पुरुष व स्त्री यांमधील हाही पुरुष आणि प्रकृती यांतील संबंधांच्या पार्श्वभूमीवर पाहिला जाई.

वेदकाळातील सर्वात मोठी अशी सामाजिक व्यवस्था म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्था. वेदांतील पुरुष सूक्तांत परमेश्वराच्या शरीरापासून - शरीराच्या निरनिराळ्या भागांपासून हे चार वर्ण निर्माण झाले अशी संकल्पना आहे. वर वर पाहता ही एक कविकल्पना वाटते. आणि त्यातून असा अर्थ निघतो की ज्ञानसंपादन आणि ज्ञानदान करणारा तो ब्राह्मण, सामर्थ्यवान बनून समाजाचे रक्षण करतो तो क्षत्रिय, व्यापार उदीम करणारा, जीवनावश्यक गोष्टींची निर्मिती करणारा आणि कलाकौशल्यात रमणारा तो वैश्य आणि या सर्वांची कामे इमाने इतबारे करणारा तो शूद्र वस्तुतः आधुनिक काळातील मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर आपल्या ध्यानात येईल हे चार वर्ग म्हणजे मुळात अस्तित्वात असणारी ४ वैश्विक तत्त्वे होत.

1) Wisdom 2) Power 3) Harmony 4) Work या मूळ तत्त्वांचे प्रतिबिंब ४ वर्णांच्या व्यवस्थेत पडले.

यावरुन आपल्या ध्यानात येईल की सिम्बॉलिक स्टेज अथवा प्रतीकप्रधान काळातील समाजव्यवस्था ही प्रायः धार्मिक अथवा आध्यात्मिक असते. साऱ्या जगाला नियंत्रित करणाऱ्या वैश्विक आणि दैवी शक्ती मानवी समाजाच्या स्वरूपात व्यक्त होतात, असे मानले जाई. मानवी जीवनात आणि संस्कृतीत महत्त्वाचे ठरणारे इतर घटक म्हणजे नैतिकता, मानसिकता, आर्थिक निकष इत्यादी. हे त्या प्राथमिक अवस्थेत नव्हते असे नाही परंतु त्यांना काहीसे दुय्यम स्थान होते.

### Typal Stage किंवा नैतिकताप्रधान युग -

सिम्बॉलिक स्टेजनंतर दुसरा टप्पा सुरु होतो तो टायपल स्टेज अथवा नैतिकताप्रधान युगाचा. साऱ्या जगाला नियंत्रित करणाऱ्या वैश्विक आणि दैवी शक्तींना मानवी समाजाच्या स्वरूपांत व्यक्त झालेल्या पहाण्याची जी संकल्पना पूर्वी होती, ती आता मागे पडू लागते. या काळात मानवाचं मन आणि बुध्दी यांना प्राधान्य मिळून नैतिकता आणि मानसिकता यांचा समाजावर प्रभाव पडू लागतो. आध्यात्मिकता आणि धार्मिकता यांनाही काहीसं दुय्यम स्थान मिळू लागतं. धर्माचा उपयोग एकतर नैतिक शिस्त निर्माण करण्यासाठी केला जातो अथवा केवळ परलोक प्राप्तीचा विचार करण्यासाठी केला जातो. याच काळात अनेक सामाजिक आदर्श आणि आदर्शभूत अशा जीवनमूल्यांची निर्मिती केली जाते. सामाजिक प्रतिष्ठेच्या आणि सन्मानाच्या या काळात निर्माण होणाऱ्या संकल्पना समाज या टप्प्यावरुन पुढे गेला तरी कायम राहतात.

---

'लोकांना आपण कसे वाटतो, यापेक्षा आपण कसे आहोत, हे अधिक महत्त्वाचे ठरते.' -जवाहरलाल नेहरु

शुध्द चारित्र्य, धार्मिकता, भौतिक संपत्तीबद्दल अनास्था आणि ज्ञानसंपादन करण्याची व ज्ञानदान करण्याची तीव्र अभिलाषा यासर्व गोष्टींवर ब्राह्मणाची प्रतिष्ठा आणि त्याचा सन्मान ठरतो. धैर्य, सामर्थ्य, शौर्य, संयम, चारित्र्यशीलता इत्यादी गुणांवर क्षत्रियाचा सन्मान होतो. व्यापार-उदीमातील सच्चेपणा उत्तम निर्मिती, औदार्य, लोककल्याणाबद्दल जिव्हाळा इत्यादी गुणांनी वैश्याचा सन्मान होतो तर आज्ञाधारकपणा विश्वासूपणा इत्यादी गुणांनी शूद्राचा सन्मान होतो.

हे सर्व उदात्त असे आदर्श टिकवून ठेवणे, हीच समाजापुढील मोठी समस्या असते. या आदर्शांना टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या संवर्धनासाठी समाज काही बाह्य सोहोळ्यांचा आधार घेऊ लागतो. वंशपरंपरा हाही अशाच प्रकारे एका सुरक्षित आधार घेण्याचा प्रयत्न असतो. परंतु हे सारं करताना उदात्त अशा आदर्शांचं मूळ खोल कुठे तरी दृष्टिआड होतं आणि उरतात, ती सर्व बाह्य अवडंबरं. यानंतर समाज फक्त रुढी आणि परंपरा यांचं पालन करण्यात मशगूल राहतो. वंशपरंपरेत बाह्य कर्म टिकवून ठेवलं तरी आंतरिक आदर्श टिकतातच असे नाही. आणि त्यामुळे एकूणच समाज हळू हळू खालच्या स्तरावर जाऊ लागतो.

मानवी सभ्यतेच्या पहिल्या दोन टप्प्यांचा विचार येथवर पूर्ण झाला. पुढील ३ टप्प्यांचा विचार पुढील लेखांकात करु.

**टीप :-** महायोगी श्री अरविंद यांच्या या ग्रंथाच्या आधारे

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## विज्ञान कलेच्या सेवेत

सुमारे १५१३ च्या दरम्यान लिओ नार्दो-द-व्हिंसी (वी) याने हृदयाचे अतिशय तपशीलवार चित्र तयार केले व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण हस्ताक्षरात त्याने या अवयवावर सुमारे २००० शब्दांचे टिपण लिहिले. त्याने मानवी शरीरातील रचनेचीही काही चित्रे काढली आहेत. १५०९ च्या सुमारास त्याने सर्पाच्या शरीरातील अवयवाचे चित्र काढले होते. ते आज रॉयल कलेक्शन ट्रस्ट या राणी एलिझाबेथ २ यांच्या संग्रहात आहे.

लिओ नार्दो-द-व्हिंसी यांच्या चित्रांचे (लिओ नार्दो-द-व्हिंसी-अॅनाटॉमिस्ट) एक प्रदर्शन लंडनला बकिंग हॅम पॅलेस मधील राणीच्या दालनात (क्वीनस् गॅलरी) ४ मे पासून सुरु असून ते ७ ऑक्टोबर १२ पर्यंत प्रेक्षकांना पाहता येत आहे.

वस्तुसंग्रहालयाचे संचालक मार्टिन क्लेटॉन म्हणतात, लिओ नार्दो-द-व्हिंसी ची चित्रे ही 'विज्ञान कलेच्या सेवेत' आहे याची साक्ष पटवणारी आहेत. मला हे लक्षात आणून द्यावयाचे आहे व हे खरे विधान आहे.

व्हिंसीला आपल्या आयुष्याच्या कालखंडात त्याच्यातील शरीररचना शास्त्रज्ञाची ओळ समजली नाही; मात्र क्लेटॉन यांचा विश्वास आहे की त्यांची वेगळी चित्रे अतिशय बोलकी आहेत. त्यांनी म्हटले आहे की, इतिहासातील कोणत्याही अॅनॉटॉमिस्ट च्या बरोबरीचे ते होते.

संदर्भ : न्यू सायंटिस - पत्रे २०१२ खंड[११४] / अंक[१८१] 'आर्टिस्टिक अॅनॉटॉमी' (लेखक - टिफानी ओ. कॅवाघान) पृ. ४३

(लेखातील माहितीवरुन संपादित)

# माझी जन्मठेप

*सावरकरांच्या उडीची शताब्दी यानिमित्ताने वि. प्र. मंडळाने घेतलेल्या स्पर्धेतील माझी जन्मठेपवरील हा निबंध*

क्रांतिकारकांचे सेनापती, स्वातंत्र्यसैनिकांचे अग्रणी हिंदु राष्ट्रवाद मांडणारे तत्त्वज्ञ व सक्रिय हिंदू संघटक, क्रियाशील धर्मसुधारक व समाजसुधारक प्रेरणादायी महाकवी आणि विज्ञाननिष्ठ व राष्ट्राची शस्त्रसज्जता यांबाबत प्रखर विचार मांडणारे विचारवंत! अशा शब्दांत स्वातंत्र्यवीर सावरकर या महान व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करता येईल.



दि. २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रात नाशिकजवळच्या भगूर गावी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म झाला.

तीव्र बुद्धिमत्ता, आक्रमी व साहसी वृत्ती हृदयातील मानव्य व सर्जनशील कवित्व लाभलेले हे बालक वयाच्या दहाव्या वर्षीच इतिहास आणि धर्मशास्त्रावरील जाडजूड पुस्तके वाचू लागले.

त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेला 'स्वदेशीचा फटका' 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात.

चाफेकर बंधुना फाशी दिल्याचे समजताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता भगवती हिच्यापुढे सशस्त्र क्रांतीची शपथ घेऊन अखेरपर्यंत देशासाठी झुंझण्याचा निश्चय केला. एवढ्या लहान वयात असल्यापासून त्यांचे मन देशप्रेमाने किती भारलेले होते, याचा आपल्याला प्रत्यय येतो. त्याचप्रमाणे त्यांचे मन संवेदनाशील होते. तरुणपणी सावरकरांनी अभिनव भारत व मित्रमेळा या गुप्त क्रांतिकारी संघटनांची स्थापना केली व तरुण पिढीमध्ये देशाभिमान जागृत केला, अनेक देशभक्त सावरकरांच्या कठोर देशप्रेमाने भारले गेले व त्यांनी आपल्या मायभूमीला स्वतंत्र करण्याची शपथ घेतली. पुण्यामध्ये विदेशी कपड्यांची होळी करून जनमानसात सावरकरांनी स्वदेशीची हाक दिली.

सावरकरांचे माझी जन्मठेप हे पुस्तक वाचताना मला सर्वात जास्त प्रभावित करणारा त्यांचा गुण म्हणजे दूरदृष्टी! प्रत्येक निर्णयात, त्यांना आपल्या देशाचे उज्ज्वल भविष्य डोळ्यांसमोर असे. त्यांनी केलेला स्वदेशीचा पुरस्कार, शस्त्रनिपुणतेचा आग्रह व जातिभेदांना केलेला प्रखर विरोध ही त्यांच्या उत्तम दूरदृष्टीची साक्ष देतात. आपल्या देशाचे भवितव्य उज्ज्वल असण्यासाठी वरील गोष्टींचे आचरण त्यांच्या मते फार महत्त्वाचे होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर सन १९०६ साली उच्च

'तुम्ही मुलांना ज्या गोष्टी दिल्यात त्यापेक्षा त्यांच्याशी जसे वागता, त्यावरून ती तुम्हांला लक्षात ठेवतील.' -रिचर्ड इवान्स

शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. तेथे कायद्याचा अभ्यास करून बॅरिस्टर पदवी मिळविली. इंग्लंडमधील वास्तव्यातच त्यांनी अनेक क्रांतिकारी योजना आखल्या. बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान माहीत करून घेतले, व ही माहिती, तसेच पिस्तुले पुस्तकांमध्ये दडवून भारतातील क्रांतिकारकांपर्यंत रवाना केले. ब्रिटिश सरकारला ह्या प्रयत्नांचा सुगावा लागला होता.




सावरकरांनी त्यांच्या ओघवत्या वाणीने इंग्लंड व भारतातील क्रांतिकारकांना झपाटून टाकले होते ब्रिटिश सरकारला सावरकरांना अटकाव करणे जरूरी वाटू लागले, व त्याचाच परिणाम म्हणून सावरकरांना इंग्लंडमध्ये अटक करण्यात आली. त्यांना अटक करून समुद्रमार्गाने बोटीतून भारतात आणण्याचा बेत ठरविला गेला. ती बोट फ्रान्सच्या मार्सेलिस बंदराजवळून जात असताना सावरकरांनी बोटीतून उडी मारून पोहून फ्रान्सचा किनारा गाठण्याचा प्रयत्न केला. फ्रान्सच्या किनाऱ्यापासून काही अंतरावरच भारतीय क्रांतिकारक त्यांना सुखरूप नेण्यासाठी तयार होते. त्यात मादाम कामा वगैरेंचा समावेश होता. परंतु दुर्दैवाने सावरकरांना पळून जाण्यात अपयश आले. फ्रान्सच्या किनाऱ्यावर फ्रान्स पोलिसांनी त्यांना पकडले. सावरकरांनी त्या पोलिसांना विनंती केली, की त्यांना ब्रिटिशांच्या ताब्यात देऊ नये, परंतु त्यांची मागणी अमान्य झाली.

हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला चालला व सावरकरांना १९१० साली दोन जन्मठेपेच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. दोन जन्मठेप म्हणजे पन्नास वर्षे सक्तमजुरी! उभ्या आयुष्याची राखरांगोळी. दुसरा कोणी सामान्य असता, तर त्याने शिक्षा ऐकताच हाय खाल्ली असती, परंतु सावरकर मूर्तिमंत धैर्याचे महामेरू, त्यांनी ही शिक्षा स्थितप्रज्ञ वृत्तीने स्वीकारली.

सावरकरांना २४ डिसेंबर १९१० रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. २७ जून १९११ रोजी अंदमानला काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी त्यांना 'महाराजा' बोटीवर चढविण्यात आले त्यानंतर सतत १४ वर्षे अत्यंत हालअपेष्टा, छळ, क्रूर शिक्षा, श्रम अपमान यांना त्यांनी अत्यंत धीराने तोंड दिले. या काळातील त्यांनी सहन केलेल्या अत्यंत हृदयद्रावक प्रसंगाचे वर्णन सावरकरांनी 'माझी जन्मठेप' ह्या पुस्तकात केले आहे.

हे पुस्तक वाचताना अंदमानातील कैदीजीवन, क्रूर छळ, शिक्षा, बेफाम तुरुंग अधिकारी व मानवतेला कलंक लावणारे त्यांचे वर्तन यांची आपल्याला माहिती मिळते. तसेच हे पुस्तक आपल्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आचार विचारांचे उत्तम दर्शन घडविते. संपूर्ण निवेदन प्रथम पुरुषांत असल्याने व भाषा प्रवाही आणि तेजस्वी असल्याने आपण त्यात गुंगुन जातो.



अशा ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सावरकरांनी लिहिलेले मनोगत आपल्याला अंतर्मुख करते. ते

लिहितात, आम्ही सुटून आल्यावर महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून सहस्त्रावधी देशबांधवांनी सहानुभूतिपूर्ण औत्सुक्य अनेक समयी व्यक्त केले. अंदमानची कथा ओठांबाहेर येईना, वाटे हे सर्व सांगण्यासाठी का ते भोगिले. मग तो सर्व अभिनयच म्हणावयाचा.

त्यांच्या मते त्यांच्याबरोबर तशाच शिक्षा भोगून जे देशबांधव त्या यातनांना बळी पडले त्यांना त्यांच्या प्रियजनांना भेटून त्यांचे दु:ख व्यक्त करण्याचेही समाधान मिळाले नाही त्यांच्याशी प्रतारणा होईल. यावरून आपल्याला कळते की सावरकरांचे मन किती विशाल व संवेदनाशील होते.

त्यावेळी कैद्यांच्या समूहाला 'चलान' असे संबोधिण्यात येत असे. असे हे चलान मद्रासला महाराजा बोटीवर चढविण्यात आले. सावरकरांना अट्टल दरोडेखोर, खुनी, चोर यांच्यासमवेतच ठेवण्यात आले. बोटीवर अत्यंत अस्वच्छता व असुविधा होती. प्रत्येक अधिकारी व कैदी सावरकरांच्या बॅरिस्टर असण्यामुळे अचंबित होत. व वारंवार त्यांच्या शिक्षेच्या वर्षांची चौकशी करत. अत्यंत घाणीचे साम्राज्य असलेल्या प्रवासाची सांगता सहा दिवसांनी झाली व महाराजा बोट अंदमानच्या किनाऱ्याला लागली.

अंदमान बेट अत्यंत निबिड जंगल होते. तेथील जंगलात अनेक प्रकारचे साप, किडे, जळवा, सापसुरळ्या यांचे वास्तव्य होते. भयंकर डास व त्यामुळे मलेरियाचा प्रादुर्भाव होता.

स्वातंत्र्यवीरांना बेडी, डोक्यावर सामान व अनवाणीपणे तुरुंगात आणण्यात आले. येथे असलेले अनेक अधिकारी भारतीय असत. परंतु ब्रिटीश अधिकाऱ्यांवर प्रभाव पाडून वरची श्रेणी मिळविण्याच्या हेतूने ते त्यांच्यासमोर कैद्यांना जास्तीत जास्त त्रास देत.

सावरकरांना सर्वांपेक्षा अलग ठेवण्यात आले. सात नंबरची खोली त्यांना देण्यात आली. त्यांचे वाचनाचे, लिखाणाचे सामान जप्त करण्यात आले. पहिल्या काही प्रकरणांत सावरकरांची स्थिती त्यांनी वर्णन केली आहे. सर्वप्रथम काही दिवस त्यांना बॅरिस्टर असल्याने अंगमेहनतीचे काम दिले जाणार नाही असे भासविण्यात आले.

प्रथम त्यांना नारळाचा काथ्या बनविण्याचे काम देण्यात आले परंतु राजबंदी कैद्यांना कष्टप्रद कामे देण्यात येऊ नयेत या मागणीसाठी राजबंदी कैद्यांनी असहकार पुकारला व त्याचा ठपका सावरकरांवर ठेवून त्यांना कोलूला जुंपण्यात आले.

ही कोलूची शिक्षा महाभयंकर असे. घाण्याला बैलाप्रमाणे जुंपून रोज ठरावीक लीटर तेल खोबऱ्यापासून काढावे लागे. तेवढे तेल जमा झाले नाही, तर सोट्याचा मार मिळत असे. आजारी, अशक्त कोणालाही शिक्षेत मुभा दिली जात नसे.

सकाळी उठल्याउठल्या कोलूस जुंपण्यास येई. शरीर अत्यंत थकून जाई, हातापायात तो कोलू ओढण्याचे जराही बळ रहात नसे, तेव्हा कैक वेळा त्यांचे मन बंड करून उठे, त्यांना वाटे त्यांच्या शरीराचा व कर्तृत्वाचा मायभूमीसाठी उपयोग व्हायला हवा. आता ते मातीमोल ठरले, मायभूमीतील राष्ट्रबांधवांना या कष्टांचे अवाक्षर देखील कळत नाही. मग नैतिक परिणाम दूरच. तेव्हा ह्या देहाचा काही उपयोग नाही. आत्महत्या करून जीवन संपविण्याचा विचारही एकदोनदा त्यांच्या मनात आला, परंतु बुद्धीने मनावर विजय मिळविला त्यांना त्यांच्या बुद्धीने साक्षात्कार झाला, की कारपीडनाचे मूल्य देणे म्हणजे जीवन व्यर्थ जाणे नव्हे तर ह्या कारागृहात देशसेवाच होत आहे व म्हणून हे जीवन अव्यर्थ आहे.

---

'बुद्धिमत्ता असूनही महत्त्वाकांक्षी नसेल तर, पंख नसलेल्या पक्षासारखीच स्थिती.' -साल्वादोर दाली




तेलाच्या घाण्यात काम करित असताना अतिशय शारीरिक व मानसिक त्रास होत असे. परंतु त्यात एक चांगली गोष्ट घडत होती, की त्यावेळी इतर राजकीय बंदिवानांशी त्यांची चोरून भेट होत असे व त्यावेळी ते सर्वजण देशभक्तीच्या उदात्त हेतूने व मायभूमीला स्वतंत्र करण्याच्या झपाट्याने प्रेरित झाले त्या हेतुविषयी चर्चा करत. स्वातंत्र्यवीर सावरकर लिहितात, की त्या भेटीमुळे माझे कष्ट, त्रास मला विसरायला होऊन परत चैतन्य मिळत असे. त्या भेटीत सावरकर निराशेच्या गर्तेत सापडलेल्या त्यांच्या सहबंदिवानांना इतिहासातील गोष्टी सांगून धीर देत असत.

चौदा दिवस घाण्याचे काम झाल्यावर त्यांना परत दोरखंड वळण्याचे काम देण्यात आले.

तुरुंगात सावरकरांनी वारंवार पुस्तके देण्याची मागणी केली, परंतु राजबंद्याना पुस्तके देण्यास तुरुंगाधिकाऱ्यांनी साफ नकार दिला. तेव्हा घायपाताचे काटे झाली लेखणी, व तुरुंगांच्या भिंती झाल्या कागद. ओळी मुखोद्गत करून पुढील काव्य रचले जाई, धन्य त्या सावरकरांची!

अंदमानमध्ये राजबंद्यांना पुरविले जाणारे अन्न अत्यंत दुर्लक्षित, घाणेरडेपणे व आरोग्यास हानिकारक पद्धतीने शिजवलेले असे. ते बहुदा अर्धेकच्चे असे त्यामुळे कित्येक वेळा घासलेट मिश्रित कांजी आणि साप व गोमेसकट शिजवलेली भाजी खाण्याची वेळ येई.

सावरकरांना उंच टेकडीवरील साहेबांच्या बंगल्यात पाठीवर कावड घेऊन पाणी भरण्याचे काम देण्यात आले. ते काम करणे जेव्हा अशक्य झाले, तेव्हा त्यांनी ते नाकारले. त्याची शिक्षा म्हणून त्यांना आठ दिवस हातबेडीची शिक्षा देण्यात आली. त्या हात बेडीच्या क्रूर शिक्षेमुळे त्यांना १०४ ताप चढला व ते बेशुद्ध पडले.

बंदिवानांना विजेचे झटके दिले जात. एकाचवेळी अनेक रक्षक कोठडीत शिरून बेदम मारहाण करून निघून जात.

बंदिवानांना मिळणाऱ्या दुधावरही या अधिकाऱ्यांचा डोळा असे. त्यांना त्यात वाटा हवा असे. तो नाही दिला की शिक्षा!

अशा भयानक त्रासाला कंटाळून अनेक जणांनी कोठडीत फास लावून जीव दिले. काही वेडे झाले. सावरकरांचे वडील बंधूही त्याच कारागृहात शिक्षा भोगत होते. हे आणखी दुर्दैव!

अशा प्रकारे, अनेक शारीरिक व मानसिक कष्ट सहन करत सावरकरांनी १४ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा भोगली, ती केवळ जाज्वल्य देशप्रेमामुळे. या वास्तव्यात त्यांनी आपले मनोधैर्य ढळू दिले नाही. त्यांनी आपली देशप्रेमाची ओढ सतत कायम ठेवली व आपल्या इतर सहबंदिवानांना आधारस्तंभ बनून राहिले. तुरुंगातील अन्यायाला एकजूट करून शक्य तेव्हा वाचा फोडली. व सर्वात महत्त्वाचे म्हणजे एवढ्या प्रतिकूल परिस्थितीत प्रतिभा जागवून काव्यनिर्मिती केली.

---

'देवाची कृपा संपादन करणे म्हणजे विम्यासारखे आहे. याचा फायदा आपल्या संकटाच्या वेळी होतो.' –सत्य साई बाबा

त्यांच्या उत्तम वागणुकीचा परिणाम म्हणून इंग्रज सरकारने त्यांची लवकर सुटका केली. अंदमानहून परत आल्यावर त्यांना काही दिवस रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

१९४७ रोजी भारत स्वतंत्र झालेला त्यांनी पाहिला व त्यांचे स्वप्न पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी स्वतःला समाजकार्यात वाहून घेतले. जातिभेदांच्या विरोधात खूप कार्य केले.

हे आत्मचरित्र वाचून मन अतिशय व्यथित होते कारण कारागृहातील कष्ट, यातना यांचे वर्णन वाचून मन हेलावून जाते. आणि त्याचबरोबर सावरकरांबद्दल मनात अमाप आदर दाटून येतो. त्यांनी व इतर देशबांधवानी आपल्या देशासाठी केलेल्या त्यागामुळे आज आपण स्वतंत्र भारतात ताठ मानेने राहू शकतो. ही जाणीव मनात जागी होते. त्यांचे हे आत्मचरित्र पिढ्यानपिढ्या प्रेरणादायी ठरेल यात शंकाच नाही.

आदित्य जोशी
बी ५०३, अमालफी, रहेजा गार्डनस्
तीन हात नाका, ठाणे
मो. ९८३३१५५५६८

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

## मादाम तुसाँ संग्रहालय

लंडनमधील प्रसिद्ध मादाम तुसाँ संग्रहालय मेणाच्या पुतळ्यांसाठी प्रसिद्ध आहे. मेरी ग्रोशोल्त्झ (मेरी तुसाँ) हिने या संग्रहालयाची प्रथम स्थापना केली. तिचा जन्म १७६१ मध्ये फ्रान्समध्ये झाला. तिची आई डॉ. फिलीप कुरटियस यांच्या घरात काम करायची. त्यांच्याकडे मेणाचे पुतळे तयार करण्याची कला होती. फिलीप यांनी मेरीला ही कला शिकविली. फिलीप यांनी पंधराव्या लुईची पत्नी जीन द बेरी हिचा पुतळा तयार केला. तो लंडनच्या संग्रहालयात आजही पाहण्यासाठी खुला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात तिने मृत लोकांची प्रतीकेही साकारली. १७९४ मध्ये फिलीप यांचे निधन झाले, तेव्हा त्यांनी साकारलेले पुतळे मेरीच्या स्वाधीन केले होते. तिने ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंडचा प्रवास करून आपल्या पुतळ्यांचे प्रदर्शन ठिकठिकाणी मांडले. त्यानंतर १८३५ मध्ये लंडनमधील बेकर स्ट्रीटवर पहिल्यांदा तिला प्रदर्शनासाठी कायमस्वरूपी जागा मिळाली. त्यानंतर १८४२ मध्ये मेरीने स्वतःचाच पुतळाही साकारला. तो आजही या प्रदर्शनात पाहायला मिळतो. १८८४ पासून हे प्रदर्शन मेरिलबोन रस्त्यावर कायमस्वरूपी हलविण्यात आले. आता या संग्रहालयाच्या ॲमस्टरडॅम, लास वेगास, न्यूयॉर्क, हाँगकाँग, शांघाय आणि वॉशिंग्टन येथेही शाखा आहेत.

- संग्रहातून

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

("मुळाक्षरे देवत्वाची" - भाग २ परीक्षण)

*उत्तरा हुद्दार यांच्या पुस्तकावरील लेखाचा हा दुसरा भाग आहे. - संपादक*

## प्रास्ताविक

दिशाच्या मागील अंकात आपण **"मुळाक्षरे देवत्वाची"** ह्या **उत्तरा हुद्दार** यांच्या पुस्तकावर विचार केला. त्यांतील 'गणेश', 'गणपती', 'गजानन', 'विनायक' ह्या निरनिराळ्या नावाने प्रसिध्द असलेल्या सगुण, मूर्ती स्वरुपातील 'देवता तत्वावर' विचार करताना, उत्तराताईंनी ज्या **'गणेश विद्या'** ह्या आध्यात्मिक साधनाबद्दल काही विचार मांडले, त्यावर एक विस्तृत भाष्य पुढच्या भागात करण्याचे आश्वासन मी दिले होत **'मुळाक्षरे देवत्वाची'** या मुळ पुस्तकात **"श्री गणेश देवता"** ह्या लेखांत उत्तराताईंनी ह्या गणेश देवतेच्या प्रसादाने **'लिपी शास्त्र'** (पा.नं. ५२) व महाभारत काळच्या वेद व्यासांच्या लेखनिक व नृत्यशात्र व **'संगीत शात्रातील देणगी'**, ह्या पध्दतीने झालेल्या मानवी संस्कृती व कला ह्यांच्यावरच्या प्रभावाचा उल्लेख केला.

## भौतिक जड विचार

माझ्या मते हा 'प्रसाद' भौतिक विद्यांच्या स्तरावरचा मानावयाला पाहिजे. कारण, 'गणेश' ह्या देवता तत्वाचा अंतिम खरा उच्च हेतू जो "आध्यात्मिक" आहे, तिकडे समाजाचे पिढ्या नि पिढ्या दुर्लक्ष होते आहे असे मला मनोमन वाटते, आणि तिकडे ह्या महत्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधणे हे **"अध्यात्म विद्या"** म्हणजे **"स्पिरीच्यूअल सायन्सच्या"** ("SPIRITUAL SCIENCE") दृष्टीने **अत्यावश्यक आहे. हिंदू संस्कृतीचा आधार वेद ज्ञान व त्यातील वैदिक, आध्यात्मिक 'बीज' ज्ञान हेच आहे. हे सत्य आहे.**

मुळात एक गोष्ट जाणणे महत्वाचे आहे, ते म्हणजे भारतीय संस्कृतीतील पायाभूत व बीजज्ञानात ईश्वर देव, देवता ह्या ज्ञानाचा मूळ संदर्भ वेद ह्या **'अपौरूषेय ज्ञान वेद संहितेतच आहे.'** पण, ही देणगी ज्या पूर्णावस्थेत प्रगती केलेल्या **'आर्य समाज'** वा **'वैदिक समाज'** स्थिरावली. तिच्यावर एक 'जलप्रलयाची' आपत्ति आली. त्यामुळे संस्कृती व ज्ञान व त्या अनुषंगाने साध्य केलेल्य उपासना, योग व तंत्र साधनेबद्दल पुढच्या पिढ्या पूर्णपणे अनभिज्ञ राहिल्या किंवा त्यांना तुटक ज्ञान प्रवाहाचाच अपूर्ण लाभ झाला.

ह्या संबंधात, **"महामहोपाध्याय श्री. बाळशास्त्री हरदास"** आपल्या **"वैदिक राष्ट्रदर्शन"** ह्याच्या **खण्ड २** मध्ये काय म्हणतात **ते महत्वाचे आहे. पुणे येथे दिलेल्या त्यांच्या भाषण मालेचे हे पुस्तक हिंदी रुपांतर आहे व ते भाषांतर R.S.S. चे पूर्व सरसंघचालक श्री. कुपहल्ली सीतारामैया सुदर्शनजी यांनी केलेले आहे.**

ते लिहीतात :-

"पुराणोंके इस स्वरुप को ध्यान में रखते हुए उसके आधारपर आर्यो के अधिदेव तथा उनके व्दारा किये गये विश्व के स्पष्टीकरण की ओर ध्यान देने से **'वेदों के देवतावाद'** की योग्य उपपती होती हैं, एवं निसर्गपूजा आदि कल्पनापाशों से मुक्ति होकर वैदिक देवताओं की योग्य कल्पना आती है। और सब यह स्पष्ट हो जाता है कि ऋग्वेदसे लेकर उपनिषदों तक देवकल्पना का क्रमशः विकास मानना क्यो व कैसे गलत है।

**वैदिक संस्कृति के इतिहास के हिमप्रलय की विपत्ति के कारण दो विभाग पड गये**। हिमप्रलय के पश्चात बचे खुचे वेद साहित्य को एकत्रित कर व्यास ने आज के वेदों का संहितीकरण किया है। परंतु यह वेदों का **दूसरा संहितीकरण** हैं। इससे पूर्व, हिमप्रलय के पहिले के काल मे **यज्ञप्रधान वैदिक संस्कृति**, वैदिकोंका **'सुगंठित समाज'** तथा उसके लिये आवश्यक वेदोंका संहितीकरण अस्तित्वभान थे।

यह बात ऋगवेद के ब्दारा भी स्पष्ट है। वैदिक साहित्य में इस प्रलयपूर्वकालीन स्थिती का उल्लेख **'देवांना पूर्णे युगे' 'तानि धर्माणि प्रथमन्यासन'** आदि शब्दोब्दारा हुआ है।

**सुगंठित समाज?**

ह्या सामाजिक इतिहासाच्या माहीतीचा संदर्भ आपल्या विषयापुरता अतीशय महत्वाचा आहे. ह्यातील **'सुगंठित समाज'** ह्या विशेषणाचेसुध्दा पूर्ण महत्व जाणायला हवे।

वेदामध्ये **'ब्रह्मणस्पती सूक्त'** हे आपल्या काळातील **परिचित 'गणपती'चे मूळ स्वरुप आहे.** म्हणजे 'ब्रह्मणस्पती' हेच खरोखर **गणपती देवतेचे खरे आध्यात्मिक स्वरुप वेदकाळांत जाणले गेले होते. त्यामुळे देवता शक्ति खऱ्या अर्थाने (Reality) जाणावयाची असल्यास हे मानणे आवश्यक आहे.**

**बृहस्पती सुंक्त**

बृहस्पती सुंक्त त्याच्या एंकंदर ६४ ऋचा ऋग्वेदाच्या १०६०० ऋचामध्ये विस्कळीत पध्दतीने निरनिराळ्या १ ते १० मंडलात आहेत. ह्या विषयाचा विशेष अभ्यास असे दर्शविते की **'गणपती' म्हणजेच 'ब्रह्मणस्पती'**.

**गणपती ही पौराणकालीन संज्ञा वा स्वरुप तर ब्रह्मणस्पती ही या सूक्तातून 'आवाहन केलेली' बुध्दिदात्ती वैदिक सत्य स्वरुप होय.**

**''गणानां त्वां गणपतिं हवामहे, कविं कवीनामुप श्रवस्तम्। ज्येष्ठराजं ब्रह्मणा ब्रह्मणस्पत, आ नः श्रृण्वनृतिभिः सीद सादनम।। ऋगवेद २.२३.१**

डॉ. चित्रावशास्त्री, महामहोपाध्याय **विद्यानिधी** म्हणतात की त्या मंडलातील २३, २४, २५, २६ सूक्तांच्या ''पठणाने'' **गृत्समद ऋषींना 'ब्राह्मणत्व' प्राप्त झाले** अशी ''आख्यायिका 'गणेश पुराणात' आढळते. ब्राह्मणत्व म्हणजे ब्राह्मण तत्वस्थान होय. **'ब्रह्मज्ञान'** हे त्याचे फलित. विश्वाची उत्पती व कार्यभार हेतू ह्याचे ज्ञान व ते हस्तगत करण्याच्या विद्या अवगत होते ही खरी प्राप्ती.

**भौतिक प्रतिक, प्रतिमा, सगुण, अवस्था**

आता ह्या ऋग्वेदातील ब्रह्मणस्फूर्ती सूक्ताचा संदर्भ लौकिक, प्रतिमायुक्त, सगुण म्हणा हवे तर अशा गणेश, गणपती, विनायक वगैरे संकल्पनांशी कसा लागतो ते पाहूया.

**अव्यक्त विश्वजगत**

मुळात ऋग्वेदातील ब्रह्मणस्पती किंवा बृहस्पती ह्या संकल्पना **पुरुषसूक्ता** ज्या **अव्यक्त विश्वाचा** उल्लेख आहे त्या विश्वसंकल्पनेतील **बीज तत्वांशी आहे**. हे अव्यक्त जगात आहे पण त्यामुळे आगम, अव्यक्त, अदृश्य आहेच पण त्याचा पूर्ण प्रभाव हा व्यक्त जगात, जड जगात पडतो व **देवता शक्तीला आहवनीय आहे**, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

ब्रह्मणस्पती ही अन्न आणि समृध्दि यांची देवता मानलेली आहे. या बुध्दीदात्या देवतेच्या उपस्थितीशिवाय कोणतेही **धर्मकार्य** सिध्दीस जात नसल्याचा सुस्पष्ट निर्देश आढळतो. (ऋगवेद १.१८.७)

'आनंदाचे रहस्य स्वातंत्र्यामध्ये असते. स्वातंत्र्याचे रहस्य धाडसामध्ये असते.' - थूसिडिडस

'ऋकवेत्' संज्ञा गणांचा अधिपती या नात्याने ब्रह्मणस्पतीस गणपती ही उपाधी प्राप्त झाली (४.५०.५)

''तेजस्वी गणयुक्त आणि शब्दयुक्त, बहुस्तुत बृहस्पतीने बलरुपी मेघाला फोडून हंबरणाऱ्या हण्यदोहक क्षेनूंची मुक्तता केली.

**चुकीचे अर्थ का?**

ह्याच ''इंद्राबृहस्पतीसूक्त, पुरोहित प्रशंसा ह्या (४.५०) सुक्तात इतर काही संदर्भ व संकल्पना आहेत त्यांचा अर्थ न समजल्याने किंवा चूकीचा अर्थ लावल्याने वैदीक अन्यक्त शक्ती संकल्पना व त्याचे लौकिक, प्रतिमात्मक वा सगूण स्वरुप यामध्ये गोंधळ, असमज अर्थबोध न झाल्याचे आता लक्षात येते आहे.''

महामहोपाध्याय चित्रावशास्त्री (ऋ ४.१८) ह्या बृहस्पतीसूक्तावर स्पष्टिकरण देताना म्हणतात

**गणपती उपासना - पौराणिक काळात गणपतीच्या उपासनेस 'खरी प्रतिष्ठा' प्राप्त झाली.**
**(म्हणजे ती लुप्त कधी व केंव्हा व कां झाली? यशवंत साने विचारतात)**



वैदिक साहित्यातील ब्रह्मणस्पती आणि उपनिवसाहित्यातील ॐ काराची सांगड घालण्यात येऊन त्या दोहोंचे प्रतिरुप असा गणपती ज्ञान, विद्या आणि सुखसमृध्दी यांचे अधिष्ठान मानण्यात येऊ लागला.

**गणपती हे सध्याचे स्वरुप वैदिक ब्रह्मणस्पति 'देवतेचे' विकसित(?) स्वरुप होय [पानं २६) ऋग्वेदाचे मराठी भाषांतर संपादक कै. विनायक सिध्देश्वरशास्त्री चित्राव)]**

**''समग्र देवगणामध्ये सर्वप्रथम ब्रह्मणस्पती निर्माण झाल्याचा आणि त्याने 'देवगण' निर्माण केल्याचा निर्देश ऋग्वेदात आढळतो.**

ह्या संदर्भात ऋग्वेद १०.७१ सूक्त '' ज्ञान प्रशंसासूक्त'' महत्वाचे आहे. (ऋषी-बृहस्पती अंगिरस, देवता-ज्ञान; छंद - जगति, अवजिष्ट - त्रिष्टुभ)

**''बृहस्पते प्रथमं वाचो अग्रम'' ऋचेने प्रारंभ होणाऱ्या प्रस्तुत सूक्तात वेदज्ञान नसण्यारांची तसेच उपजीविकेसाठी मंत्रपठण करण्यारांची निंदा** [१०(४,६)]; आणि वेदवेत्यांचे आणि परब्राह्मज्ञानाचे स्तवन आढळते.



**महत्वाचा संदर्भ म्हणजे - युगान्ती नष्ट झालेले ज्ञान ऋषींनी पुन्हा प्राप्त केल्याचा निर्देश ३ऱ्या ऋचेत आढळतो.**

यज्ञकर्माच्या साह्याने 'ऋची' पदवी आणि वेद प्राप्त झालेल्या **ज्ञानवान लोकांनी समस्त वेद गायत्र्यादि सप्त**

समर्थ लोक घडतात. ते वेळोवेळच्या त्यांच्या विरोधकांमुळे. - फ्रँक हॅरिस, साहित्यिक

**छंदमध्ये गोवून त्याचा सर्वत्र प्रसार केला.**

ब्रह्मणस्पती(अन्यक्त) ही आपल्या गणेशाची (व्यक्त) मूळ संकल्पना

माझ्या ह्या लेखाचा उद्देश हाच आहे की आजच्या काळात **'गणेश पूजा'** व **'गणेश विद्या'** ह्यांचा जो उल्लेख **'गणेश'** ह्या देवतेच्या नावाने होतो आहे, तो मुळात **'बृहस्पती'** व **'ब्रह्मणस्पती'** ह्या वैदिक, वैश्विक **'तत्व संकल्पनेशी'** आहे. 'तत्व' हे सृष्टीनिर्मितीतील अनंतस्वरुप 'बीज' होय.

ब्रह्मणस्पतीच्या सुक्तातून व ऋचेंतून जे विशेष वर्णन लाभते ते एका आगमशास्त्रातून, उपासनेतून, मंत्र व योग ह्या विद्यांच्या मदतीने त्याचा अर्थ व प्रत्यक्षीकरणाचा लाभ होऊ शकतो. हे न केल्यास फक्त 'प्रतिमा व भौतिक मूर्ती' ह्यांनाच सत्य कल्पून केलेले एक बहीर्गत व 'शुष्क' कर्मकांड होते.

ज्या पुरोहितांवर, ह्या गूढ व आगय शास्त्राच्या मदतीने यजमानाला किंवा साधकाला ही पूजा, आवाहन करून देवतांच्या सामर्थ्याचा लाभ होऊ शकेल, त्याची 'सत्य, पूर्ण, अंतरगातील, योगिक, साधना सांगण्याची व करुन घेण्याची **'जबाबदारी'** आहे. **ही आवश्यकता आज दिसत नाही.**

ऋग्वेदातील वरील काही ऋचांच्या वर्णनात सुध्दा ह्या क्रिया खऱ्या अर्थाने होत नाहीत, त्याची कारणे दर्शवली आहेत व त्याबद्दल खेद व खंत सुध्दा दिसून येते आहे.

**अज्ञानाचे निराकरण अत्यावश्यक**

तेंव्हा हे 'अज्ञान' कां नाहीसे होत नाही, याबद्दल संशोधन करणे, हा या लेखाचा हेतू आहे. हे कोडे सोडवण्यासाठी आपल्याला, **महायोगी अरविंद यांच्या** 'The Secrets in Vedas' 'वेद रहस्य' ह्या पुस्तकाचा अत्यंत फायदा होऊ शकतो.




**पूर्वी सांगितल्याप्रमाणे वेदाच्या (आज उपलब्ध असलेल्या) संहिता दुय्यम दर्जाच्या व तुटक व अपूर्ण आहेत. त्यामुळे ज्या ज्ञानाच्या आधाराने आपण ते संशोधन करणार तेच मुळात तुटपुंजे आहे.**

श्री. अरविंद यांचा मोठा शोध म्हणजे वामदेव, अंगिरस वगैरे ऋषींच्या द्रष्टेपणात्वामुळे जे शब्दबध्द संहिता व अंतर्गत ज्ञान आपल्याला प्राप्त झाले, ते एकां सांकेतिक 'कल्पना दृश्यांवर' आधारलेले आहे. त्यांतील उषा, गोः अश्व, तेज, नद्या, पर्वत, गुहा, यज्ञ वगैरे हे शब्द एका भौतिक कल्पना दृश्यांशी बांधलेले आहेत. त्यामुळे त्यांचे व्याकरणावर, निरुक्तावर, व्यावहारिक अर्थावरले निष्कर्ष हमखास चुकलेले प्राप्त होतील.

त्याचे कारण, हे कीं ही उपासना व ह्यांची दैवते ह्यांची क्रिया ही अदृश्य व अव्यक्त जगात होत आहे. शिवाय ज्या यजमानाला या क्रिया व्हाव्यात म्हणून प्रयत्न करावयाचे आहेत, त्याला ह्या क्रिया त्याच्या अंतःकरणात व मनाच्या व प्राणशक्तिच्या सहाय्याने करावयाच्या आहेत.

**यज्ञ सत्य क्रिया कोणत्या व कशा?**



'जी व्यक्ती एकदाही चुकत नाही, याचा अर्थ असा ही तिने कधीच काही नवे करण्याचा प्रयत्न केला नाही.'

- अल्बर्ट आइन्स्टाइन

त्या क्रिया मधील 'यज्ञ' हा बहीर्गत व जड वस्तूंचा नसून 'आत्मयज्ञ, समाधी साधन, साक्षात्कार, कुंडलिनी जागृती, अपरोक्ष अनुभूती या मार्गाने होणार आहे. ह्या क्रिया कोणा 'एजंटच्या' मार्फत होऊन 'ट्रेन्स्फर' होणार नाहीत. शिवाय ह्या क्रियांचा आधार हा शुध्द शरीर व शुध्द मन, चित्र व अंतःकरण यांच्या जोरावरच होणार आहेत, तेव्हां ह्या साधन सामुग्री व आध्यात्मिक विद्यामध्ये कमतरता असेल तर त्या क्रिया होणार नाहीत, **ही काळ्या दगडावरची रेघ आहे. इथे हयगय, तडजोड नाही!!**

ह्या वर्णनाला की 'पूर्ण न्याय' देऊ म्हणालो, तर आणखी काही पुस्तके/लेख/दर्शने व प्रयोग करावे लागतील. तेंव्हा थोडक्यात सूत्र पध्दती अंगिकारितो आहे.

हे मी माझ्या विचारांचे स्तोम माजवण्याकरितां करीत नसून ह्या सामान साधन सामुग्रीची एक पुसटशी कल्पना देण्यासाठी करीत आहे हे नमूद करतो. त्याकरितां मी अरविंदाचे त्यांच्या शब्दातले वर्णन उद्धृत करतो.

देवता ही आपलीच मन:शक्ति

**''देवता, देव म्हणजे मानवाच्या मनातील दिव्यशक्ति, मनाच्याच साधनाने, मानवास त्याचे प्रत घेऊन जातात. अनंत सत्यचेतनेच्या ह्या शक्ति अतिमानस चेतनेतील या शक्तींना चिकटून राहतात व मानवास अमरत्वाप्रत नेतात.'' (हा मानव = आत्मा +शरीर असा याचा अर्थ 'आत्मा' हा इथे यजमान आहे)**

''वरवर दिसणाऱ्या सामान्य उपमामधून वेदांत, हीच सप्त नद्यांची, जलांची, पांच जगतांची, अग्नि, जन्म व त्याचे आरोहणाची व मानवाच्या निरनिराळ्या अवस्थातून होणाऱ्या उत्क्रांतीची कल्पना इतर वर्णनाच्या पारदर्शक बुरख्यामागे स्वच्छपणे दिसते. वर पाहिल्याप्रमाणे गायीची, सोमाची, जलाची उपमा लक्षात घेऊन त्याच्या उपयोगाने सर्व वेदांचा मुळ अर्थ आपणास स्पष्टपणे कळतो.''

Human being is an embodided consciousnes,

माणूस हा शरीरबध्द जीवात्मा आहे.

त्यामुळे हा सगळा उद्योग 'आत्मोध्दाराचा आहे', तो पूर्णपणे काम्य वा भौतिक करून टाकण्याची किमया 'गणेश', गजानन, विनायक ह्या पूराणावर आधारलेल्या संकल्पनेने केली आहे. ही मुख्य अडचण 'अथर्वशीर्ष' किंवा गणेशविद्या समजण्या मागील आहे.

गणेश विद्या शॉर्टकट चर्चा

ह्या सर्व पसाऱ्यातून थोडा 'शॉर्ट कट' घेऊन प्रथम **'गणेश विद्या'** ह्या बीज संकल्पनेकडे वळू या.

१) **प्रथम ही 'विद्या' आहे. 'अविद्या' नव्हे!** अविद्या म्हणजे अज्ञान नव्हे तर ह्या भौतिक जगातील जड ज्ञान होय. आत्मा व ईश्वर ह्यांना जाणण्याकरिता विद्या साधना हवी.

२) गणेश ही मूळ देवता स्वरुप नसून 'ब्रह्मणस्पती' ही मूळ वैदिक देवता आहे.

३) ह्या 'विद्येच्या' साधनेसाठी 'अथर्वण ऋषींनी जी योजना रचली आहे, तिचा **'क्रमरूपाने'** वापर करावयाला हवा.

(३.१) शांतिपाठ

(३.२) अधिदैवत प्रतिपादनेचा पूर्ण अर्थ प्राप्त होतो.

(३.३) स्वप्रतिज्ञा - 'ऋतं वच्मि। सत्यं वच्मि

(३.४) अध्यात्मप्रतिपदकचा अर्थ बोध
त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः।
त्वं आनंदमयं ब्रह्ममयः। वगैरे
त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसि।

(३.५) **अधिदैवत** :- सर्व जगदिदं त्वत्तो जायते।....

'प्रत्येकावर विश्वास ठेवणे घातक असतेच, मात्र कोणावरही विश्वास न ठेवणे अधिक घातक असते.' - अब्राहम लिंकन

(३.६) अध्यात्म प्रकाशक :- त्वं गुणत्रयातीत: ।


त्वं देहत्रयातीत: ।

त्वं कालत्रयातीत: ।

...वगैरे संकल्पना (कोण आहे ही देवता? आत्म्याचा उध्दार करणारी?)

(३.७) श्रीगणेश-विद्यात्मक-अर्थ प्रतिपादक साधनेची कुंजिका-किल्ली !!

### अभ्यंकर व अथर्वशीर्ष




विद्या वाचस्पती श्री. शंकर वासुदेव अभ्यंकर हे आपल्या ।। श्री गणपती अथर्वशीर्ष।। ह्या ४१६ पानांच्या ग्रंथात वर दर्शविलेल्या तर्क पध्दतीतील क्रमपध्दतीने ९ व्या प्रकरणात 'श्रीगणेशविद्या' खण्ड असे नाव देतात ते योग्यच आहे.

(श्री गणेशविद्यात्मक अर्थप्रतिपादक सप्तम खंड समाप्त)

**गणादि पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरम्। अनुस्वार: परतर:। अर्ध्देंदुलसिंतं। तारेण रूध्दम्। एतत्रवमनुस्वरुपम्। गकार: पूर्वरुपम्। अकारो मध्यमरुपम्। अनुस्वारश्चान्त्यारुपम्।**

**बिन्दुरुत्तररुपम्। नाद:सन्धानम। संहिता संधि:। सैषा गणेशविद्या। गणक ऋषि:। निचृद गायत्रीछन्द:। गणपतिर्देवता। ॐ गं गणपतये नम:।।**

प्रथम हे स्पष्टपणे जाणायला पाहिजे की हे वर्णन अतरंगात होणाऱ्या साधनेचे आहे व तसे पुरावे त्यातील गण, वर्ण उच्चार यांचा अनुक्रम, अनुस्वार हा मातृकाशक्तीतील संदर्भ परतर: ह्याने दर्शविला आहे. 'अर्धेन्दु' हे स्थान आज्ञाचक्राच्या वर सूक्ष्म प्राण शरीरातील पातळीवरचे आहे, हे जोडलेल्या



चित्रावरुन दिसेल, नाद हा चैतन्यशक्ति म्हणजे कांशसनेस कंप होणाऱ्या 'वेव्ह' (wave freeguency) बद्दल आहे, तो भौतिकातील आवाज नव्हे नाद अनुसंधानाची क्रिया सुध्दा एक गूढ Synthesis म्हणजे यज्ञक्रिया आहे, 'बिंदू' हे तर उघड 'रेत' क्रियेतील स्थान व स्थिती दर्शवते. तेव्हां या क्रिया उर्ध्वरित क्रियेवर उत्पादित झालेल्या कुंडलिनीशी संबंधीत आहेत.

जर ह्या क्रिया आगम शास्त्रातील मंत्र स्वरुपाच्या दीप्तीनंतर झाल्या तरच त्याला देवतेला आवाहन करण्याचे सामर्थ्य असू शकेल. त्यामुळे वाकणकर यांनी जो ''सुंदर अभ्यास'' केला आहे. पान नं.२९० यावर ह्या क्रिया आधारलेल्या आहेत. असे श्री. शंकर अभ्यंकर म्हणतात, ते पटत नाही व खरे नाही.

पुराणोक्त गणेशविद्या ही एकदमच निष्प्राण व देवतांचे आवाहन सुध्दा न करु शकणारी अशी करुन त्यातील संकल्पना 'भाषा लिपी' शास्त्राशी जोडण्याची गंभीर चूक इथे होते आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

ज्या 'वाणीची' संकल्पना भौतिक स्तरावर जाणली गेली आहे, ती ऋग्वेदाच्या सुत्रातील आध्यात्मिक सामर्थ्य

वा पुरुषार्थाची निर्देशक होते आहे, असे सत्य मानणे अशक्य वाटते. ह्या वाणीचे गूढ आध्यात्मिक स्वरुप व क्रिया आहे. हे मंत्र सामर्थ्य आहे.

"स्वतःच्या वाणीने दशादिशा व्यापणाऱ्या, त्रैलोक्य निवासी आणि मधुरजिव्ह बृहस्पतीला यज्ञप्रवण ऋषींनी यज्ञस्थानी स्थापिले" - (ऋग्वेद ४.५०.१)

"तेजस्वी गणयुक्त आणि शब्दयुक्त, बहुस्तुत बृहस्पतीने बलरुपी मेघाला फोडून हंबरणाऱ्या धेनूंची मुक्तता केली." (ऋग्वेद ४.५०.५)

तेंव्हा हा खरा 'आत्मयज्ञ' ह्या क्रिया करण्याची अपेक्षा आहे. हे गण कोणते? गणांचे अनेक अर्थ आहेत. त्यांतील भाषाशास्त्रातले हे नव्हेत.

माझे परममित्र वैष्णवादी मंत्रयोगी डॉ. धनंजय डोंगरे यांच्या मताने "कामधेनू मंत्रातील अर्थ इथे अभिप्रेत आहेत." (ग+ण= गण)

ग = कुंडलिनी रुप ण = परम कुंडलिनी

म्हणजेच जीवात्म्याशी संबंध असलेल्या शरीरामार्फत कुंडलिनी जागृत करुन उर्ध्वरेत करुन ते रेत हविद्रव्य म्हणून मस्तकातील यज्ञकुंडातील 'आहवनीय अग्निला' ते समार्पित करणारा हा 'आत्मयज्ञ' आहे. त्यामुळे त्या शब्द ज्ञान तत्वावर आधारलेली 'वाणी' वापरुन 'बलरुपी मेघाला फोडून' - ज्या धेनू शक्तिने संपृक्त आहेत त्यांनी दिलेल्या हव्यावर हा यज्ञ संपन्न होणार आहे.

## गणेशविद्या रहस्याचा उलगडा

गणपती अथवा गणेश अथर्वशीर्षातील 'गणेशविद्या' ह्या 'उपासना क्रिया' बद्दल आपण जो विचार केला, त्याचा निष्कर्ष हाच आहे की ही एक योगिक, तांत्रिक साधना आहे. ती आत्म्याच्या स्तरावर काही वर्णित फलश्रुती मिळण्याकरितां आहे. इच्छाशक्ती, ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति ह्या आदिशक्तिच्या तीन स्वरुपांच्या एकत्रित मदतीने ही साधना होणार आहे. पण, ह्या क्रियांना ज्या 'देवता' शक्तिची मदत अत्यावश्यक आहे, तिच्याशी 'संधान' करण्याकरितां तिच्या बद्दलचे पूर्ण ज्ञान प्राथमिक जड अवस्थेत बुद्धीला व्हावयाला हवे, ते अथर्वशीर्षातील 'अधिदैवत, अध्यात्मप्रकाशक तत्वप्रदर्शक ह्या एका क्रमपध्दतीने केले जाते. ते पूर्णपणे यथाशक्ति ग्रहण व्हावे ही अपेक्षा आहेच !!

पण शेवटी ह्या जीवात्म्याला जे शरीर प्राप्त आहे. त्या शरिरांत निद्रीत अवस्थेत एक शक्ति-कुंडलिनी नावाने जाणली जाणारी 'मूलाधार स्थितोशी नित्यम्' अशी प्राप्त आहे. तिलाच 'गणेश' असे म्हणले जाऊन तिची उर्ध्वरेत क्रिया तेजस्वी, दीप्ती पावून प्राण व मन ह्यांच्या संयुक्त शक्तिने एका उर्ध्वमार्गावर चलित व संयुक्त होत होत बिंदू व अर्धेन्दू ह्या अंतरगातील (Consciousnes)

ह्या स्थानावर किंवा पातळीवर येतो. ह्या एका विशिष्ट जीवात्म्याच्या यशस्वी कुंडालिनी जागृती व उर्ध्वरेत क्रियेनंतर "ॐ गं गणपतेय नमः" ह्या मानसी जपाने-ध्यान, धारणा, समाधि ह्या संयमाने युक्त असे त्या स्थानाशी (भ्रमरगुंफा ब्रह्मरंध्र) परम वैश्विक महाकुंडलिनीच्या वैश्विक स्पंदांशी नादानुसंधात होते. त्यामुळे इच्छित 'देवता' ह्या जीवात्म्याला हवे असलेले, ईच्छा व्यक्त केलेले पसायदान, फलश्रुती देते आणि ही अथर्वशीर्षांनी आध्यात्मिक मार्ग दर्शवलेली साधना संपूर्ण होते.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

'विश्वास हा एखाद्या काचेच्या भांड्यासारखा असतो. एकदा फुटला तर जुळवून ठेवता येतो, मात्र पुन्हा पूर्ववत होत नाही.' - अज्ञात

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी पूर्व प्राथमिक विभाग

मे महिन्याची सुट्टी संपवून सर्व विद्यार्थी, तसेच शिक्षक नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत करण्यास सज्ज झाले. नवीन मुलं, त्यांचे बोबडे बोल, गमती जमती हे सर्व अनुभवायला शिक्षक उत्सुक होते.

शुक्रवार १५ जून रोजी शाळा चालू झाली. या आधीच म्हणजे शनिवार ९ जून रोजी ज्युनियर के. जी. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. ए. के. जोशी शाळेच्या 'परिचयात्मक सभेचे' (Introductory meeting) आयोजन करण्यात आले होते.

या सभेला पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी संबोधित केले. त्यांनी सर्व पालकांना शाळेचा व शाळेतील विविध उपक्रमांचा अल्पसा परिचय करून दिला. पालकांनी आपल्या पाल्याला या शाळेत दाखल केले आहे आणि ए. के. जोशी परिवारात सामील झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. पालकांचे कोकम सरबत देऊन स्वागत करण्यात आले. नंतर पालकांनी पूर्व प्राथमिक विभागाचे निरीक्षण केले, तसेच शिक्षकांची भेट घेतली.

यानंतरचे दोन शनिवार म्हणजेच २३ जून व ३० रोजी ज्युनियर के.जी.च्या पालकांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. २३ जूनला गणित व परिसर अभ्यास तर ३० जूनला भाषा या विषयावरील कार्यशाळा घेण्यात आल्या. शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने हे सर्व विषय कसे शिकवले जातात, याचे मार्गदर्शन शिक्षकांनी या कार्यशाळांतून केले.

शाळेत अभ्यासक्रमाबरोबरच सण साजरे करणे, त्या दिवशी काय करायचे त्यामागचे कारण मुलांना सांगितले जाते. शाळा सुरू झाल्यावर येते ती आषाढी एकादशी. २९ जूनला आम्ही शाळेत आषाढी साजरी केली. मुलांना विठ्ठलाचा गजर व श्लोक शिकवले. हा दिवस आणि पावसाळा या दोन्हींचा मेळ घालून 'झाडे लावा' हा संदेश दिला. प्रत्येक शिक्षिकेने एक अशी ओवा व पाती चहा ह्या औषधी रोपट्यांचे वृक्षारोपण केले. झाडांची काळजी घ्या, ती कापू नका; तर वाढवा असे शिक्षकांनी मुलांना सांगितले. ज्युनियर के. जी. च्या मुलांनी हा उपक्रम केला.

सिनीयर के. जी. चे दोन विद्यार्थी एक मुलगा विठोबाचा तर मुलीने रुक्मीणीचा वेष परिधान करून आले होते. ते ज्युनियर के. जी. च्या सर्व मुलांसमोर विटेवर उभे राहिले. सर्वांनी विठ्ठल नामाचा गजर केला.

सिनीयर के.जी.च्या मुलांची दिंडी आयोजित केली होती. ४-५ मुलांनी विठ्ठलाचा फोटो असलेली पालखी आनंदाने घेतली. इतर सर्व मुले 'विठूचा गजर हरिनामाचा' असं म्हणत पालखीच्या मागून दिंडीत सहभागी झाली. शाळेच्या आवारात आमच्या छोट्यांची दिंडी फारच रंगली होती. विठ्ठल रखुमाई समोर पालखी ठेवून विठ्ठलाचा गजर, श्लोक म्हटले. काही मुलींनी फुगड्या घातल्या. नंतर परत ही दिंडी पालखी आणि आमचे छोटे वारकरी आपल्या वर्गात परतले.

या वारीत आम्ही सर्व शिक्षकही सहभागी झालो होतो. काही वेळाच्या वारीत आम्हांला इतका आनंद मिळाला, तर वारकऱ्यांच्या मन:स्थितीची आपण सर्वजण कल्पना करू शकतो. आषाढीचा प्रसाद म्हणून मुलांना शेंगदाणे आणि गूळ देण्यात आला.

---

विचारीपणाखेरीज अध्ययन व अध्ययनाखेरीज विचारीपणा दोन्ही निष्फळ असतात.

अशा रीतीने, उत्साहात व आनंदाने आमचा यावर्षीच्या उपक्रमांचा श्रीगणेशा झाला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

### संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०११-२०१२ चा निकाल

१००% निकाल : परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ७२

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी :**

१) प्रणिल जोशी – प्रथम क्रमांक
२) अनिकेत बर्वे – चवथा क्रमांक
३) राज जोशी – पाचवा क्रमांक
४) चैतन्य केळकर – पाचवा क्रमांक
५) सौरभ कुलकर्णी – आठवा क्रमांक
६) निनाद मराठे – नववा क्रमांक
७) अनुज नरनवार – नववा क्रमांक
८) सानिका शेट्ये – नववा क्रमांक

**इ. ८ वी तील वैष्णवी देसाई हिला ठाणे जिल्हा जलतरण स्पर्धेत खालील पदके मिळाली :**

१) १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये – सुवर्णपदक
२) २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये – सुवर्णपदक
३) ४०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये – सुवर्णपदक
४) ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये – रौप्य पदक
५) ८०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये – रौप्य पदक

राज्य स्तरावरील स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली आहे.

**इंडियन इन्स्टिट्यूट आयोजित गणित प्रज्ञा परीक्षेचा निकाल:**

एकूण २५ विद्यार्थी या परीक्षेला उपस्थित होते. त्यापैकी खालील यशस्वी विद्यार्थींना क्रमांकानुसार प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

| क्र. | इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | ६ वी | श्रीदीप क्षिरसागर | २३ |
| २ | ६ वी | शांभवी जोशी | ९८ |
| ३ | ६ वी | आकांक्षा राडे | १२२ |
| ४ | ६ वी | ओंकार वरुडकर | १६४ |
| ५ | ८ वी | तक्ष सत्रा | ५७ |
| ६ | ८ वी | चैतन्य केळकर | ६० |
| ७ | ८ वी | सौरभ कुलकर्णी | १२१ |
| ८ | ८ वी | अमित मलीये | १३० |
| ९ | ९ वी | शुभम अलशी | १८६ |

**फेब्रु. २०१२ – टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : १००%**

| इ. | बसलेले विद्यार्थी | विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी विद्यार्थी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | २२ | ०५ | १५ | ०१ | ०१ |
| ६वी | ०९ | ०४ | ०३ | ०२ | - |
| ७वी | ०३ | ०१ | ०२ | - | - |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे**

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | ऋतुज बारगोडे | ८७ |
| | श्रेयस शिंदे | ८७ |
| ६ वी | शांभवी जोशी | ९९ |
| ७ वी | शिवानी पिसाट | ९१ |

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल – एप्रिल २०१२**

वाडिया कॉलेज पुणे आयोजित महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत कु. सन्मय आघारकर ह्याने महाराष्ट्रातील राज्य स्तरावर ३३ वा क्रमांक पटकाविला.

---

गर्विष्ठ माणसाला कधीच मित्र नसतात. वैभवाच्या काळात तो कोणाला ओळखत नाही आणि विपत्तीच्या काळात त्याला कुणी ओळखत नाही.

## तंत्रनिकेतन

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (M S B T E) उन्हाळी २०११.२०१२ परीक्षेचे निकाल जाहीर**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी २०११-१२ या वर्षीच्या घेण्यात आलेल्या परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगले घवघवीत यश संपादन केले आहे. तंत्रनिकेतनमध्ये अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे अभ्यासक्रमानुसार खालीलप्रमाणे आहेत.

### प्रथम वर्ष (SEM I + SEM II)

| अ. क्र. | कोर्स | विद्यार्थ्यांचे नाव | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | CH | जाधव प्रेम प्रमोद | १२५०/१६७५ | ७४.६२% |
| २ | CO | पंडीत वरद प्रकाश | १४८१/१६७५ | ८८.४१% |
| ३ | EPS | पटवर्धन सलील सतीश | १३९८/१६७५ | ८३.४६% |
| ४ | IE | गुर्जरी अनिलकुमार एल. | १२९६/१५५० | ८३.६१% |
| ५ | IF | वैती प्रिया जितेंद्र | १५२४/१६७५ | ९०.९८% |
| ६ | IS | शेट्टीगर सोनिया रवी | १२०५/१५५० | ७७.७४% |
| ७ | MU | शर्मा तृप्ती अनुपकुमार | १३५४/१५५० | ८७.३५% |

### द्वितीय वर्ष (SEM I + SEM II)

| अ. क्र. | कोर्स | विद्यार्थ्यांचे नाव | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | CH | बागुल निखिल दिपक | १३५६/१६७५ | ८०.९५% |
| २ | CO | चौबे अपूर्वा विमल | १३५४/१५७५ | ८५.९६% |
| ३ | EPS | काटकर निशिता जयप्रकाश | १४७१/१८०० | ८१.७२% |
| ४ | IE | साजेकर महेश्वरी शंकर | १४८५/१७५० | ८४.८५% |
| ५ | IF | देसाई कोमल बाळकृष्ण | १३६५/१५५० | ८८.०६% |
| ६ | IS | विसारिया हार्दीक नेमचंद | १४१९/१७५० | ८१.०८% |
| ७ | MU | धाग दक्षता दत्ता | १३९३/१७७५ | ७८.४८% |

**पुढील अंकात :** दिशासाठी आलेले १ ऑगस्टच्या कार्यक्रमात सादर झालेले तंत्रनिकेतन व कला वाणिज्य महाविद्यालयांचे अहवाल.

तृतीय वर्ष (SEM V+ SEM VI)

| अ. क्र. | कोर्स | विद्यार्थ्यांचे नाव | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | CH | ढाकडे नितिन अंकुश | १३८३/१७०० | ८१.३५% |
| २ | CO | पाटील कोमल रविंद्र | १३८२/१५५० | ८९.१६% |
| ३ | EPS | अडसुळ सुनिल विश्वास | १३९०/१६५० | ८४.२४% |
| ४ | IE | शुक्ला विश्वप्रकाश एस. | १५७६/१७५० | ९०.०५% |
| ५ | IF | पठाण श्रमीन | १३०६/१६०० | ८१.६२% |
| ६ | IS | तानाजी अदनान | १३६९/१७०० | ८०.५२% |
| ७ | MU | चव्हाण अनुश्री विनोद | १५३१/१८०० | ८५.०६% |

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकवर्ग यांचेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

- वृत्त संकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे

## भारतातील घटक राज्य व सार्वजनिक ग्रंथालय कायदे

| अनुक्रमांक | वर्ष | राज्ये |
|---|---|---|
| १. | १९४८ | तामिळनाडू (मद्रास) सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| २. | १९६० | आंध्रप्रदेश (हैद्राबाद) सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ३. | १९६५ | कर्नाटक सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ४. | १९६७ | महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ५. | १९७९ | पश्चिम बंगाल सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ६. | १९८८ | मणिपूर सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ७. | १९८९ | हरियाणा सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ८. | १९८९ | केरळ सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ९. | १९९३ | गोवा सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १०. | १९९३ | मिझोराम सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| ११. | २००१ | गुजरात सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १२. | २००१ | ओरिसा सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १३. | २००५ | उत्तर प्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १४. | २००५ | उत्तराखंड (उत्तरांचल) सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १५. | २००६ | राजस्थान सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १६. | २००७ | बिहार सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १७. | २००७ | छत्तीसगड सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १८. | २००७ | पॉंडेचेरी सार्वजनिक ग्रंथालय कायदा |
| १९. | २००९ | अरुणाचल प्रदेश सार्वजनिक ग्रंथालय कायदा |

# प्रगत अध्ययन केंद्राचा अभ्यासक्रम व माहिती

*महाविद्यालय परिसरातील प्रगत अभ्यास केंद्रांच्या नव्या अभ्यासक्रमाबाबत*

खाजगी क्षेत्रात आरोग्य केंद्राच्या सेवांचे व त्यांना आर्थिक मदत करण्याचे काम अलिकडच्या काळात भारतामध्ये लक्षणीयरीत्या वाढले आहे. फक्त संख्या वाढली असे नाही, तर अधिक सुविधायुक्त व विशेष आरोग्यसेवा लोकवस्तीत अगदी दाराशी येऊन ठेपल्या आहेत.

या हॉस्पिटलमधील डॉक्टर्स आपल्या क्षेत्रातील जाणकार असतात. परंतु हॉस्पिटलचे व्यवस्थापन व दैनंदिन काम पहाणे हे त्यांच्यासाठी दिवसेंदिवस कठीण होत आहे. हॉस्पिटलचे व्यवस्थापन कार्यालयीन कामकाज, कार्यालयीन वागणूक व हॉस्पिटल आधारित वागणूक हे वेगाने सर्वाधिक महत्त्वाचे प्राधान्य क्षेत्र ठरत आहे. याचा परिणाम म्हणजे हॉस्पिटल आधुनिक बनत चालली आहेत व त्यांतील शस्त्रक्रिया, औषधोपचार व इतर इलाजांसाठी अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे.

आजच्या चांगल्या हॉस्पिटलची कार्ये विचारात घेता, त्यांत समर्पित भावनेने रुग्णांची काळजी घेणे, रोगप्रतिकार वाढवणे, निदान करणे, उपचार, पुनर्वसन, शिक्षण व संशोधन यांचा समावेश होतो. हॉस्पिटल हे शक्यतोवर समाजाच्या आरोग्य सेवेचे, या सेवांच्या चळवळीचे केंद्र बनून प्रतिकारक्षम औषधोपचारांचे उपयोजन करीत आहे.

हॉस्पिटल सामाजिक आरोग्य व कल्याण अधिकारी यांच्याशी प्रभावी सहकार्य करून या सर्वांचे उत्तरदायी ठरत आहे. जनसंपर्काची मुळेही हॉस्पिटलमधील प्रत्येक कर्मचारी,मदतनीस व संचालक मंडळ यांची कामे, दृष्टिकोन व प्रवृत्ती यामध्ये आढळतात. वैयक्तिकरीत्या व सामूहिकरीत्या हॉस्पिटल बाबतचे मत व नावलौकिक जनमानसातील प्रतिमेला आकार देतात.

परिचारीकांच्या सुश्रुषेचा दर्जा, खाद्यसेवा, अंतर्गत सेवांमधील कार्यक्षमता, डॉक्टर्सचा सर्व साधारण दृष्टिकोन, कर्मचाऱ्यांचा दृष्टिकोन या सर्वांचा नावलौकिकात मोठा वाटा असतो. हॉस्पिटलच्या नावलौकिकास कारणीभूत असतात. त्यामुळे चांगल्या जनसंपर्कावर भर देण्यात येतो. जेणेकरुन हॉस्पिटलचा नावलौकिक व मान टिकू शकेल.

हॉस्पिटलच्या कामकाजासाठी अनेक अधिकृत प्रमाणपत्रांची, परवान्यांची व तत्सम कागदपत्रांची गरज भासते. या कागदपत्रांची जुळवाजुळव व वापर टाळता येत नाही; कारण राज्यशासन स्थानिक स्वराज्य संस्था यांना हा दस्तऐवज लागतो.

वैद्यकीय निगा हा आपले आयुष्य तब्येत व एकूण आरोग्य यांसाठी महत्त्वाचा विषय आहे. पण या वैद्यकीय कामकाजात निर्माण होणारा कचरा घातक विषारी व अनारोग्यकारक असतो. याचे कारण म्हणजे रोगप्रसाराची दाट शक्यता या घातक व विषारी कचऱ्यात असते. संसर्गजन्य जैव औषधे व रेडिओ ॲक्टिव्ह साहित्य (शरीरात टोचलेल्या सुया व स्कॅपल्स) अतिशय धोकादायक असतात. त्यासाठी त्यांची योग्य हाताळणी करणे व विल्हेवाट लावणे, नगरपालिकेच्या कचऱ्यात ती टाकणे गरजेचे असते. यांचा बेकायदेशीर व अनैतिक पुनर्वापार अतिशय धोकादायक व जीवघेणा ठरू शकतो.

हॉस्पिटलच्या सर्वसाधारण सुरक्षेच्या दृष्टीने आगीपासून संरक्षण करण्याची योजना ही अपरिहार्य असते. अशी सुरक्षा हॉस्पिटल्सचे सर्व व्यवस्थापक , कर्मचारी व रचनाकार या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने या क्षेत्रातील अद्ययावत उपयांचे उपयोजन करावयास हवे.

हॉस्पिटल हे रुग्णांच्या फायद्यासाठी बांधले व चालवले जाते. पूर्ण आणि अचूक रेकॉर्डस सांभाळण्यात आलेले अपयश म्हणजे पेशंट व अनेक दृष्टीने कुटुंब आणि समाज यांना द्यावयाच्या सेवेत आलेले अपयश होय. वैद्यकीय रेकॉर्डस हे औषध शास्त्रीयदृष्ट्या लगेच निदान होऊन रुग्णला भविष्यात योग्य उपचार मिळावेत या दृष्टीने महत्वाचे असतात. काही बाबतीत तर जीवन मरणाचा प्रश्न सोडवू शकणारे असतात. वैद्यकीय रेकॉर्डस हे हॉस्पिटलचे व त्यांच्या सेवांचे मूल्यमापन करणारे असतात. त्यांच्यामुळे हॉस्पिटलची कार्यक्षमता वाढते आणि मृत्यूचे प्रमाण, रोगांचे प्रमाण कमी होऊन रुग्णांची यथायोग्य काळजी घेतली जाते. या रेकॉर्डसचा उपयोग डॉक्टर्स आणि इतरांना शिक्षण व प्रशिक्षण देणारे स्त्रोत म्हणून होतो. यशस्वी संशोधनाचे हे रेकॉर्डस महत्वाचे साधन ठरतात. हे रेकॉर्डस पूर्ण करणे हा एक प्रश्नच असतो. विशेषतः कामाचा ताण असलेल्या डॉक्टर्सना हे काम त्रासदायक ठरते. रुग्णांची काळजी घेणे या आपल्या प्राथमिक कर्तव्याशिवाय डॉक्टर्ससाठी कर्मचारी व इतर डॉक्टर्सच्या कामाचा समन्वय घडवून आणणे, खाटांचे व्यवस्थापन करणे, साहित्याचा वापर, खोल्या या सर्वांचे व्यवस्थापन करणे हे कठीण काम ठरते. रुग्णांची काळजी घेताना वापरल्या जाणाऱ्या बाबी म्हणजे कापूस, इंजेक्शनच्या सिरीज, औषधे पेशंटसंबंधित कामे (बिल बनविणे, आर्थिक नियोजन करणे इ.) या सर्व गोष्टींकडे डॉक्टरला लक्ष द्यावे लागते. अशा वातावरणात पेशंटस आणि त्यांची काळजी घेणारे व्यावसायिक यांना काही अडचणी व आव्हानांना सामोरे जावे लागते.

औषधे वा इतर साहित्य यांचा साठा करणे आवश्यक असते. यांची यादी ही गरजेपुरती असावी लागते. साठा कमी होईल वा जास्त होईल असे होता कामा नये. जास्त साठा म्हणजे जास्त किंमत व जास्त जागा मुदत बाह्य होण्याची शक्यता आणि व्यवस्थापकीय काम यांचे प्रमाण वाढते.

हे सर्व लक्षात घेऊन ठाणे महाविद्यालय परिसरात असणाऱ्या विद्या प्रसारक मंडळाच्या 'प्रगत अध्ययन केंद्राने' शहरातील डॉक्टरर्सशी सल्लामसलत करून 'हॉस्पिटल व्यवस्थापन' या विषयात पदव्युत्तर पदविका सुरू करावयाचे ठरविले आहे. हा अभ्यासक्रम कोणत्याही शाखेतील पदवीधर उमेदवारास हॉस्पिटल व्यवस्थापनाची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे. हा अभ्यासक्रम शासकीय नियम, कामगार कायदे, आर्थिक व्यवस्थापन, हॉस्पिटलमधील कचऱ्याचे व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, शुश्रुषा व्यवस्थापन व आगीपासून संरक्षण या सर्व विषयांना सामावणारा आहे. त्यामुळे हॉस्पिटलसमोरील व्यवस्थापकीय समस्यांची सर्व क्षेत्रे यात येतात. अधिक तपशीलासाठी केंद्राच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२५३३९८७१


मराठी भाषांतर - मोहन पाठक
ठाणे

●●●



# विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

वेळणेश्वर पाहिलं,
ऐकली गाण समुद्राची.
परशुरामाने कोकण निर्माण केलं ...
त्याचाच आवाज तो
या सर्वांशी नातं जोडलं
आमच्या विद्या प्रसारक मंडळाने
टाकत दोन पावले पुढे
ओळखून गरज काळाची
परशुरामाच्या हातातील परशु घेत
घातला घाव कोकणच्या कातळावर
आणि सुरू झाली कहाणी
विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...
अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज
वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या आमच्या डॉक्टरांनी
स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला
तिची नाडी ओळखत
केली धडपड सुरू
डॉक्टरांची विजय मिळवणारी [illegible]
समुद्रही घाबरला.
आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे
असा विचार करत, क्षणभर थरारला ...



– मोहन पाठक